सोमवार, ३ जानेवारी २०२२

# राम प्रहर

◆ वर्ष १४ ◆ अंक १६७
www.ramprahar.com

◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

घोटाळेबाज नेत्यांचा निकाल लावणार -किरीट सोमय्या/२

महडमधील गुरचरण जागेला अतिक्रमणाचा विळखा/५

आजपासून द. आफ्रिकेविरुद्ध दुसरा कसोटी सामना/६

## '...तर आपण याच वर्षी कोरोनाला संपवू शकतो'



**न्यूयॉर्क :** 'आपण आपल्यातील असमानता नष्ट केली, तर कोरोनाचे संकटदेखील नष्ट करू शकू. कोरोना साथीच्या तिसऱ्या वर्षात प्रवेश करीत असताना मला विश्वास वाटतोय की, याच वर्षी कोरोनाला संपवू शकतो, पण फक्त आपण एकत्रपणे त्यासाठी प्रयत्न करायला हवेत. प्रत्येक देशातील किमान ७० टक्के लोकसंख्या पूर्ण लसीकृत असायला हवी,' असे जागतिक आरोग्य संघटनेचे (डब्ल्यूएचओ) प्रमुख डॉ. टेड्रॉस अधानोम यांनी म्हटले आहे. त्याच वेळी जगात जितकी जास्त असमानता असेल तेवढा हा विषाणू आपण कल्पनाही करू शकणार नाही किंवा बचाव करू शकणार नाही अशा पद्धतीने घातक होऊ शकतो, अशी भीतीही डॉ. टेड्रॉस यांनी पत्रकार परिषदेत बोलताना व्यक्त केली.



# आजपासून १५ ते १८ वयोगटातील मुलांचे लसीकरण

**मुंबई : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीर केल्याप्रमाणे सोमवार (दि. ३) पासून १५ ते १८ या वयोगटातील मुला-मुलींच्या लसीकरण मोहिमेस प्रारंभ होत आहे. यासाठी आरोग्य यंत्रणा सज्ज झाली आहे.

नवीन वर्षात केंद्र सरकार

### आरोग्य यंत्रणा सज्ज

देशातील मुलांसाठी लसीकरण सुरू करीत आहेत. सुरुवातीला १५ ते १८ वयोगटातील मुलांचे लसीकरण करण्यात येणार आहे. यासाठी कोविन पोर्टलवर किंवा अॅपवर नोंदणी प्रक्रियेला सुरुवात झाली असून सोमवारपासून लस दिली जाणार आहे. मुलांकडे आधार कार्ड नसेल तरीही ते फक्त दहावीची गुणपत्रिका आणि आयडी कार्ड वापरून नोंदणी करून लसीकरणासाठी स्लॉट बुक करू शकतात. याकरिता सन २००७ वा त्यापूर्वी जन्म वर्ष असलेले लाभार्थी पात्र राहतील.

देशात लहान मुलांसाठी भारत बायोटेक कंपनीच्या कोवॅक्सिन लसीला मंजुरी देण्यात आली आहे. सध्या सरकारने १५ ते १८ वयोगटातील मुलांसाठी लसीकरण सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. देशात या वयोगटातील सुमारे १० कोटी मुले आहेत. या मुलांना लसीचा पहिला डोस लवकरात लवकर देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. कोवॅक्सिन टोचल्यानंतर २८ दिवसांनी दुसरा डोस देता येतो. त्यामुळे मुलांचे लसीकरण हे त्यांनी पहिला डोस घेतल्यावर एका महिन्याच्या आत पूर्ण होणार आहे.

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निधीतून व प्रमुख उपस्थितीत

# शाळा आणि अंगणवाडीचे उद्घाटन




### पनवेलमधील मोहोत नामफलकाचेही अनावरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील वांगणी तर्फे वाजे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील मोहो येथे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या जिल्हा नियोजन वार्षिक निधीतून जिल्हा परिषद शाळेची दुरुस्ती, तसेच मोहोचा पाडा येथे अंगणवाडी बांधण्यात आली आहे. या शाळा आणि अंगणवाडीचे उद्घाटन रविवारी (दि. २) भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले तसेच या वेळी त्यांच्या हस्ते श्री सद्गुरू कृपा समर्थ मंडळाच्या नामफलकाचे अनावरण झाले.

पनवेल तालुक्यात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून विकासकामांचा झंझावात सुरू आहे.





अशाच प्रकारे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या जिल्हा नियोजन वार्षिक निधीतून वांगणी तर्फे वाजे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील मोहो येथील जिल्हा परिषद शाळेची चार लाख रुपये निधी खर्च करून दुरुस्ती करण्यात आली आहे. या शाळेचे भाजपचे तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील आणि जि. प. सदस्य अमित जाधव यांच्या हस्ते उद्घाटन झाले. त्याचप्रमाणे मोहोचा पाडा येथे आठ लाख ५० हजार रुपये निधीतून अंगणवाडी बांधण्यात आली असून या अंगणवाडीचे भाजप युवा मोर्चाचे तालुका अध्यक्ष आनंद ढवळे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. **(पान २ वर..)**

# प. बंगालमध्ये मिनी लॉकडाऊन

**कोलकाता : वृत्तसंस्था**

देशात गेल्या काही दिवसांपासून कोरोनाबाधित रुग्णांची संख्या वेगाने वाढत आहे. त्यातच ओमायक्रॉनच्या प्रादुर्भावामुळे येत्या काही दिवसांत रुग्णसंख्येचा उद्रेक होईल अशीही भीती आहे. या पार्श्वभूमीवर अनेक राज्यांत नव्याने निर्बंध लावले जात असतानाच पश्चिम बंगाल सरकारने मोठा निर्णय घेत राज्यात मिनी लॉकडाऊन लावला आहे.



राज्याचे मुख्य सचिव एच. के. द्विवेदी यांनी पत्रकार परिषद घेऊन नवीन निर्बंधांबाबत माहिती दिली. राज्यातील सर्व शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, स्पा सेंटर, सलून, ब्युटी पार्लर, प्राणीसंग्रहालय, मनोरंजन पार्क, स्वीमिंग पूल, जीम, पर्यटनस्थळे सोमवार (दि. ३)पासून पुढील आदेशापर्यंत बंद राहतील. शासकीय आणि खाजगी कार्यालये ५० टक्के क्षमतेने चालवण्यात येतील, तर सर्व प्रशासकीय बैठका व्हर्च्युअल माध्यमातून होणार आहेत.

शॉपिंग मॉल्स, दुकाने, बार, रेस्टॉरंट्स येथे एकूण क्षमतेच्या ५० टक्के ग्राहकांची मर्यादा बंधनकारक असेल, तसेच रात्री १० वाजेपर्यंतची वेळही निर्धारित करण्यात आली आहे. सिनेमागृहांसाठीही ५० टक्के क्षमता आणि रात्री १० वाजेपर्यंतची वेळ देण्यात आली आहे. लग्न समारंभ, अंत्यविधी, तसेच सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम या ठिकाणी ५० जणांच्या उपस्थितीची मर्यादा घालण्यात आली आहे. लोकल ट्रेन ५० टक्के क्षमतेने सायंकाळी ७ वाजेपर्यंतच चालवण्यात येणार आहेत. मेट्रो ट्रेनही ५० टक्के क्षमतेने चालवल्या जातील. रात्री १० ते पहाटे ५ या वेळेत अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी, तसेच वाहने वगळता खाजगी वाहने व सामान्य नागरिकांना मनाई राहणार आहे.



**उलवे नोड : भारतीय जनता पक्ष पनवेलच्या वतीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या नववर्ष दिनदर्शिकेचे प्रकाशन रविवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, सरचिटणीस राजेंद्र पाटील, नगरसेवक हरेश केणी, बबन मुकादम, तसेच रतनशेठ भगत, निलेश भगत आदी उपस्थित होते.**

पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी



पनवेल महानगरपालिका हद्दीत
सोमवार, दि. ३ जानेवारी २०२२ रोजी होणारे

## कोरोना प्रतिबंधक लसीकरण

(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

### कोविशिल्ड

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. जुने ग्रामीण रुग्णालय, कोळीवाडा-उरण नाका, पनवेल
- ३. आयटीएम कॉलेज, नवीन पनवेल
- ४. सिडको सामाज मंदिर, से. ५ ई (ना.पा.आ.के.४, कळंबोली)
- ५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे

*सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.*

- ७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, से.२
- ८. मनस्मृती रोटरी सेंटर, खारघर
- ९. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
- १०. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग अॅण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- ११. टाटा अॅडव्हान्स सेंटर, खारघर
- १२. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
- १३. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
- १४. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
- १५. न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली

### कोवॅक्सिन

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- २. काळण समाज हॉल, पनवेल
- ३. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ५, खारघर.

### १५ ते १८ वयोगटाचे लसीकरण

- कोकण एज्युकेशन सोसायटी के. व्ही. हायस्कूल पनवेल (उपलब्ध लसी ५००)
- सेंट जोसेफ हायस्कूल खांदा कॉलनी (४००)
- केशरचंदजी आनंदरामजी बांठिया शाळा न्यू पनवेल (५००)
- सी. के. ठाकूर विद्यालय मराठी इंग्रजी माध्यमिक, न्यू पनवेल (५०० )
- एस.ई.एस. मराठी माध्यमिक हायस्कूल कळंबोली (५०० )
- के. पी. सी. स्कूल खारघर (५००)
- रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल खारघर (५००)
- ए.पी.जे स्कूल खारघर (५००)

## निवडक

### महिलांची बदनामी करणारा यूजर 'गिटहॅब'कडून ब्लॉक

**नवी दिल्ली :** बुली बाई नावाने गिटहब ऑनलाईन अॅपवर मुस्लिम महिलांचे फोटो आणि आक्षेपार्ह मजकूर अपलोड करण्यात आला आहे. इतकेच नाही तर त्या फोटोंचा लिलाव केला जात आहे. दरम्यान, गिटहब अॅपने संबंधित युजरला ब्लॉक केले आहे. सीईआरटी आणि पोलीस पुढील कारवाई करीत आहेत, अशी माहिती केंद्रीय तंत्रज्ञानमंत्री अश्विनी वैष्णव यांनी ट्वीट करून दिली आहे.

### शिवभोजन थाळी केंद्राच्या संचालकांसाठी नवे आदेश

**मुंबई :** शिवभोजन थाळीच्या नावाखाली होत असलेल्या घोटाळ्यानंतर अन्न व नागरी पुरवठा विभागाने नवे आदेश जारी केले आहेत. त्यानुसार ३१ जानेवारीपर्यंत आपापल्या शिवभोजन थाळी केंद्रात सीसीटीव्ही कॅमेरे बसवायचे आहेत. केंद्राच्या क्षमतेनुसार त्यांची संख्या असावी, तसेच प्रत्येक कॅमेऱ्यात शिवभोजन दिसायला हवे.

### मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी भारत सासणे

**उदगीर :** ९५व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी अपेक्षेप्रमाणे प्रसिद्ध कथाकार भारत सासणे यांची निवड झाली आहे. लातूर जिल्ह्यातील उदगीर येथे आगामी साहित्य संमेलन होणार आहे. सासणे यांच्यासोबतच अनिल अवचट, अच्युत गोडबोले, डॉ. रामचंद्र देखणे यांचीही नावे चर्चेत होती. बैठकीत सासणे यांच्या नावावर सर्वानुमते शिक्कामोर्तब झाले.

दिवाळी अंक स्पर्धा

सस्नेह निमंत्रण

दिवाळी अंक म्हणजे मराठी साहित्याचा उत्सव. ऐन दिवाळीत हा उत्सव आपण मोठ्या आनंदाने साजरा करतो. ती एक सांस्कृतिक परंपरा आहे. दिवाळी अंकाच्या निमित्ताने महाराष्ट्रात दर्जेदार दिवाळीअंकांची निर्मिती व्हावी, यासाठी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मुंबई मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या १८, १९ आणि २० व्या राज्यस्तरीय दिवाळीअंक स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ बुधवार दिनांक ०५/०१/२०२२ रोजी संध्याकाळी ०४:०० वा आयोजित करण्यात आला आहे.

या समारंभास आपण अवश्य उपस्थित रहावे, ही विनंती.

कार्यक्रमाचे अध्यक्ष
मा. लोकनेते श्री. रामशेठ ठाकूर साहेब
(माजी खासदार)

प्रमुख पाहुणे
मा. श्री. रामदास फुटाणे
(ज्येष्ठ कवी व साहित्यिक)
मा. श्री. दिलीप पांढरपट्टे
(महासंचालक, माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालय)
मा. श्री. रविप्रकाश कुलकर्णी
(स्तंभलेखक, ललित मासिक)
मा. श्री. नरेंद्र वाबळे
(अध्यक्ष, मुंबई मराठी पत्रकार संघ)

स्थळ
चांगु काना ठाकूर आर्टस, सायन्स, कॉमर्स महाविद्यालय,
सेक्टर ११, प्लॉट ०१, खांदा कॉलनी, नविन पनवेल.

आपले विनीत
श्री. दीपक म्हात्रे (संयोजक) (मुंबई मराठी पत्रकार संघ)
श्री. विष्णू सोनावणे (कार्यवाह) (मुंबई मराठी पत्रकार संघ)
आमदार श्री. प्रशांत ठाकूर (अध्यक्ष) (श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ)
श्री. अरुणशेठ भगत (उपाध्यक्ष)
श्री. परेश ठाकूर (सेक्रेटरी)
(श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ)

# घोटाळेबाज नेत्यांचा निकाल लावणार

## ■ किरीट सोमय्यांचा ठाकरे सरकारला इशारा

**मुंबई : प्रतिनिधी**

घोटाळ्यांचे आरोप करून राज्यातील महाविकास आघाडी सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न करणारे भाजप नेते किरीट सोमय्या यांनी पुन्हा एकदा राज्यातील ठाकरे सरकारला आव्हान दिले आहे. घोटाळेमुक्त महाराष्ट्र सरकार, असा संकल्प सोमय्या यांनी नववर्षानिमित्त केला आहे.

भाजप नेते किरीट सोमय्या यांनी नवीन वर्षाच्या शुभेच्छा देताना, २०२२ मधील संकल्प काय असेल हे ट्विट केलेल्या व्हिडीओच्या माध्यमातून सांगितले आहे. माफिया सेनामुक्त मुंबई महापालिका करणार आणि घोटाळेमुक्त महाराष्ट्र सरकार करणार असल्याचा संकल्प करत त्यांनी शिवसेना आणि महाविकास आघाडी सरकारला लक्ष्य केले आहे. ठाकरे सरकारमधील घोटाळेबाज नेते, ज्यांची चौकशी सुरू आहे, त्यांचा निकाल लावणार असल्याचे त्यांनी सांगितले. या वेळी त्यांनी महाविकास आघाडी सरकारमधील नेत्यांची आणि मंत्र्यांची थेट नावे घेतली. परिवहन मंत्री अनिल परब, भावना गवळी, आनंद अडसूळ, हसन मुश्रीफ, प्रताप सरनाईक आणि अजित पवार यांच्यावर सोमय्या यांनी निशाणा साधला.



भाजप नेते किरीट सोमय्या यांनी काही दिवसांपूर्वीच शिवसेनेवर भ्रष्टाचाराचा गंभीर आरोप केला होता. करोना काळात शिवसेनेने भ्रष्टाचाराचा जागतिक रेकॉर्ड केला, असे ते म्हणाले होते. डोंबिवलीत भाजपच्या कार्यकर्ता मेळाव्यात कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी शिवसेनेवर टीकास्त्र सोडले होते. महाविकास आघाडी सरकारमधील नेत्यांवर आरोप करत, आणखी काही मंत्र्यांचे घोटाळे उघडकीस आणणार आहे, असा इशारा त्यांनी दिला होता.

### भातखळकरांचे मलिकांना प्रत्युत्तर

**मुंबई** : राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि अल्पसंख्याक विकासमंत्री नवाब मलिक यांनी नवीन वर्षाच्या सुरुवातीपासूनच एनसीबी आणि भाजप नेत्यांवर आरोपांची मालिका सुरू ठेवलीय. मलिक यांनी रविवारी (दि. २) पत्रकार परिषद घेत समीर वानखेडे यांना मुदतवाढ मिळवून देण्यासाठी भाजपचा एक मोठा नेता प्रयत्नशील असल्याचा आरोप केला. मलिकांच्या या आरोपाला आता भाजप आमदार अतुल भातखळकर यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले. केंद्रात लॉबिंग करून पोस्टिंग करायला किंवा मिळवायला ही काय महाभकास आघाडी आहे काय, असा टोला भातखळकर यांनी लगावला आहे.

## शिरढोण ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी भाजपच्या मोनाली घरत बिनविरोध



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील शिरढोण ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदाची निवडणूक रविवारी (दि. २) झाली. यात भारतीय जनता पक्षाच्या मोनाली रोशन घरत यांची बिनविरोध निवड झाली. याबद्दल केळवणे विभागीय जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी नवनिर्वाचित उपसरपंच मोनाली घरत यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

ग्रामविकास अधिकारी गणेश पाटील यांच्या निरीक्षणाखाली निवडणूक प्रक्रिया झाली. या वेळी शिरढोण ग्रामपंचायतीच्या सरपंच साधना कातकरी, अनंत वाकडीकर, कोअर कमिटी अध्यक्ष प्रितेश मुकादम, माजी सरपंच नारायण चौधरी, माजी सदस्य पांडुरंग चौधरी, राम वाजेकर, रामदास पवार, रोशन घरत, सुधीर माळी, दीपक ठोकळ, पवन मुकादम, डायमंड मित्र मंडळ अध्यक्ष महेश माळी, महेश मुकादम, गुरू माळी, प्रदीप मुकादम, महादेव घरत, रूपेश घरत, अनंत पवार, अनंता भोपी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## आपली सोसायटी आपली जबाबदारी; पनवेलमधील मिडलक्लास सोसायटीत स्वच्छता अभियान





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील सोसायटी मित्र मंडळ आणि हॅप्पी मॅन ग्रुपच्या वतीने 'आपली सोसायटी आपली जबाबदारी' या भावनेतून रविवारी (दि. २) स्वच्छता अभियान आयोजित करण्यात आले होते. शहरातील मिडलक्लास हौसिंग सोसायटीच्या परिसरात हे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानादरम्यान जॉगिंग ट्रॅक आणि ग्राऊंडची साफसफाई करण्यात आली. या वेळी पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या स्वच्छता अभियानात हॅप्पी मॅन ग्रुपचे अनेश ढवळे, मदन कोळी, उद्योजक राजू गुप्ते, सुमित झुंजारराव, प्रशांत झुंजारराव, सुदर्शन पॉल, उल्हास झुंजारराव, रवी सोळंकी, अमेय देशमुख, अप्पा मानकामे, गिरीश जगे, सुरेश पुरोहित, राजन नावधर, गणपत भाई, श्री. माने, श्री. थोरात, श्री सारडा, श्री. निर्गुडे, श्री. खाडे, श्री. शिंदे, प्रवीण मोहोकर यांच्यासह सोसायटी क्रिकेट संघातील सदस्य सहभागी झाले होते.

## विहीघर येथील कुस्ती स्पर्धेत बाळू बोरखेने जिंकली मानाची गदा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील विहीघर येथे नववर्षाच्या पहिल्या दिवशी साईबाबा मूर्ती स्थापना वर्धापन दिन सोहळा, सत्यनारायणाची महापूजा, तसेच चिपळे ग्रामपंचायतीचे उपसरपंच मंगेश पंढरीनाथ फडके यांच्या वाढदिवसानिमित्त विविध समाजोपयोगी कार्यक्रमाचे आयोजन शनिवारी करण्यात आले होते, तसेच या कार्यक्रमांदरम्यान कुस्त्यांच्या दंगलीचे (स्पर्धेचे) आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत नाशिक येथील बाळू बोरखे याने प्रथक क्रमांक पटकावला असून त्याला चार फुटी मानाची गदा देऊन सन्मानित करण्यात आले.





विहीघर येथे नववर्षाच्या पहिल्या दिवशी म्हणजेच १ जानेवारीला श्री साईबाबा मूर्ती स्थापना वर्धापन दिन व अभिषेक, कुस्त्यांच्या दंगली, श्री सत्यनारायणाची महापूजा, ह.भ.प. शंकर महाराज आंग्रे आणि मंडळींचा त्रिवेणी संगम हरिपाठ शिवकर यांचे हरिपाठ, उपसरपंच मंगेश पंढरीनाथ फडके यांचा वाढदिवस अभीष्टचिंतन सोहळा झाला. या वेळी जय भवानी प्रासादिक भजन मंडळ वडगाव आणि श्री डांगर्णेश्वर सांप्रदायिक वारकरी भजन मंडळ मोरबे यांचे वारकरी जोड भजन झाले.

या वेळी झालेल्या कुस्त्यांच्या दंगलींमध्ये नाशिक येथील बाळू बोरखे याने प्रथम क्रमांक पटकावला. त्याला २५ हजार रुपये आणि चार फुटी गदा देऊन गौरविण्यात आले. मालेगाव येथील सैफ अली याने द्वितीय क्रमांक पटकावला असून त्याला १५ हजार रुपये आणि तीन फुटी गदा, तर तृतीय क्रमांक पटकावलेल्या मनमाड येथील धर्मा शिंदे याला १० हजार रुपये आणि अडीच फुटी गदा देऊन सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाला भाजपचे पनवेल तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, ओबीसी सेल उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, माजी सरपंच तथा महाराष्ट्र बैलगाडी शर्यत संघटनेचे अध्यक्ष पंढरीनाथ फडके, गुरुनाथ फडके, चिपळे ग्रामपंचायतीचे उपसरपंच मंगेश फडके, हिताश डेव्हलपर्सचे अक्षय फडके, उद्योजक संतोष पाटील, ग्रामपंचायत सदस्य राजेश काथारा, युवा कार्यकर्ते विश्वास पाटील, माजी सरपंच संदीप जळे, संदेश फडके, समीर खुटले, सरपंच अशोक गायकर, प्रशांत फडके, महेश म्हात्रे, शरद भगत, अविनाश शेळके, रेवन फडके यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## पनवेल मनपाची टाकाऊपासून टिकाऊ स्पर्धा

**पनवेल : प्रतिनिधी**

### स्वच्छ सर्वेक्षण २०२२

स्वच्छ सर्वेक्षण २०२२ अंतर्गत पनवेल महानगरपालिकेतर्फे टाकाऊपासून टिकाऊ स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत बनवलेली वस्तू ही टाकाऊ वस्तूपासून बनवलेली असावी. या वस्तूची टाकाऊ ते टिकाऊपर्यंतची माहितीसोबत पाठवावी.

या स्पर्धेसाठी १० जानेवारी ही अंतिम तारीख आहे. नियम व अटी पुढीलप्रमाणे आहेत. या स्पर्धेला विषयाचे बंधन नाही. एखाद्या पदार्थापासून ते बागेतल्या कचऱ्याचे व्यवस्थापन ते घरातल्या बाटल्यांना रंगवून पुनर्वापरापर्यंत कोणतीही कलाकृती यामध्ये समाविष्ट करता येईल. स्पर्धक हा पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरिक असावा.

या स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या सर्व स्पर्धकांना प्रशस्तीपत्रक देण्यात येतील. स्पर्धेमध्ये वैयक्तिक अथवा ग्रुपमध्ये सहभागी होता येईल. बनविण्यात आलेल्या वस्तूंचे २० जानेवारी रोजी छत्रपती संभाजी महाराज मैदान, पनवेल येथे प्रदर्शन भरविण्यात येऊन परीक्षणाद्वारे निकाल जाहीर करण्यात येतील. पारितोषिक वितरण सोहळा २६ जानेवारी रोजी करण्यात येईल.

स्पर्धकांना ऑनलाईन पद्धतीने महानगरपालिका मुख्यालय (स्वच्छ भारत अभियान कक्ष) किंवा आपल्या नजीकच्या प्रभाग समिती कार्यालयात, नगरसेवक कार्यालयात प्रवेशिका उपलब्ध होतील. तेथेच प्रवेशिका जमा करू शकतील. या स्पर्धेसाठी ग्रुप, वैयक्तिक स्तरावर पारितोषिक देण्यात येणार आहे. स्पर्धेसाठी https://bit.ly/3sU7WYG या लिंकवरही रजिस्टर करू शकता.

## दारूप्रकरणी महिलेवर गुन्हा दाखल

**मोहोपाडा** : तळेगाववाडी येथील गावातील बजरंगबली मंदिराजवळ सुषमा परशुराम ठाकूर हिच्याकडे बेकायदा तयार हातभट्टीची दारू रसायनी पोलिसांना मिळाली. यात रसायनी पोलिसांना एकूण एक हजार किमतीची बेकायदा हातभट्टीची दारू साधारण २५ लिटर क्षमतेच्या कॅनमध्ये मिळाली आहे. रसायनी पोलिसांनी सुषमा ठाकूर हिच्यावर महाराष्ट्र प्रो.ॲक्ट खंड ६५ (ई) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. याबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास डोंगरे, पोलीस खाड्ये तपास करीत आहेत.

पान १ वरून

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निधीतून व प्रमुख उपस्थितीत शाळा आणि अंगणवाडीचे उद्‍घाटन

या कार्यक्रमाला भाजपचे किशोर सुरते, विचुंबे ग्रामपंचायतीचे उपसरपंच प्रमोद भिंगारकर, भाजप नेते राजेश पाटील, सरपंच अशोक पवार, उपसरपंच प्रवीण म्हात्रे, माजी सरपंच गुरुनाथ भोईर, माजी उपसरपंच संतोष शेळके, प्रमोद म्हात्रे, मच्छिंद्र भोईर, मोतीराम पाटील, श्री सद्‍गुरू कृपा समर्थ मंडळाचे अध्यक्ष चाहू म्हात्रे, सचिव तुकाराम म्हात्रे, श्याम पाटील, अनंता पाटील, वामन म्हस्कर, मिलिंद म्हस्कर, नामा म्हात्रे, बाबूराव म्हात्रे, मारुती शेळके, अरविंद म्हस्कर, नितीन मोरे, विठ्ठल भोईर, बबन भोईर, जयेश पाटील, संजय पाटील, दिलीप म्हस्कर, भरत पाटील, तुळशीराम पाठे, प्रशांत म्हात्रे, भानुदास पाटील, भास्कर पाटील, सुभाष पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.



## दुखवटा

### जानकाबाई हिंदुराव



**पनवेल** : भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख यांच्या सासूबाई जानकाबाई भाऊराव हिंदुराव यांचे शनिवारी (दि. १ जानेवारी) निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, चार मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. जानकाबाई हिंदुराव यांच्या अंत्ययात्रेला माजी सिडको अध्यक्ष प्रमोद हिंदुराव, भाजपचे मुरबाड तालुका अध्यक्ष जयवंत सूर्यराव, तसेच राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. जानकाबाई यांचा दशक्रिया विधी सोमवारी १० जानेवारी रोजी श्रीक्षेत्र संगमेश्वर येथे होणार असून उत्तरकार्य मंगळवारी दि. ११ रोजी न्हावे सासणे, ता. मुरबाड, जि. ठाणे येथे राहत्या घरी होणार आहे.

### नथुराम पोरजी



**पनवेल** : तालुका भाजप चिटणीस सुरेश पोरजी यांचे वडील नथुराम महादू पोरजी (वय ८५) यांचे बुधवारी (दि. २९ डिसेंबर) अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, दोन मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. नथुराम पोरजी यांचा दशक्रिया विधी शुक्रवारी ७ जानेवारी रोजी तळोजा मजकूर येथील शिवमंदिरात होणार असून उत्तरकार्य सोमवारी १० जानेवारी रोजी धानसर येथे राहत्या घरी होणार आहे.

### मानसी परुळेकर



**पनवेल** : पनवेल शहरातील उद्योजक, बांधकाम व्यावसायिक व ओरियन मॉलचे डायरेक्टर मंगेश परुळेकर यांच्या पत्नी मानसी परुळेकर यांचे शुक्रवारी (दि. ३१ डिसेंबर) अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्यावर अमरधाम स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राजकीय, सामाजिक, तसेच व्यावसायिक क्षेत्रातील अनेक जण उपस्थित होते. मानसी परुळेकर यांच्या पश्चात त्यांचे पती, मुलगा, मुलगी, जावई असा परिवार आहे. दरम्यान, परुळेकर कुटुंबीयांच्या वतीने सर्वांनी विनंती करण्यात आली आहे की, कोरोना संक्रमण पुन्हा वाढत असल्याने कुटुंबीयांचे सांत्वन करण्यासाठी व्यक्तीशः भेट घेण्याचे टाळावे.

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : २

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सॲप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. पुढीलपैकी कोणती एकबँक सार्वजनिक क्षेत्रातील आहे म्हणजे सरकारी आहे?**
***अ.)*** एक्सिस बँक ***ब.)*** आयडीबीआय बँक ***क.)*** बंधन बँक ***ड.)*** इंडिया ओव्हरसीज बँक

**२. डिसेंबरच्या अखेरीस सेन्सेक्समध्ये समाविष्ट झालेल्या आयटी कंपनी कोणती?**
***अ.)*** इन्फोसिस ***ब.)*** टेक महिंद्रा ***क.)*** विप्रो ***ड.)*** माइंडट्री

**३. शेअर बाजाराच्या निफ्टी इंडेक्समध्ये किती कंपन्यांचा समावेश आहे?**
***अ.)*** १० ***ब.)*** ३० ***क.)*** ५० ***ड.)*** १००






**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा.**

## निवडक

### पनवेलमधून मोटरसायकलची चोरी

**पनवेल :** शहरातील ठाणानाका येथील बलशंकर ऑटो गॅरेज येथे उभी करून ठेवलेली मोटरसायकल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली आहे. सोमेश्वर पाटील (वय २७) यांची दहा हजारांची बजाज कंपनीची काळी पल्सर मोटरसायकल (एमएच ४६ व्ही ९२१०) ही तेथे उभी करून ठेवली होती. या वेळी अज्ञात चोरट्यांनी ही मोटरसायकल चोरून नेल्याने याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### तळोजा कारागृहात कैद्यांमध्ये हाणामारी

**पनवेल :** तळोजा येथील कारागृहात बंदिस्त असलेल्या कैद्यांच्या दोन गटांत गुरुवारी सकाळी तुंबळ हाणामारी झाल्याची घटना घडली. या हाणामारीत एक कैदी गंभीर जखमी झाला आहे. त्याला उपचारार्थ मुंबईतील जेजे रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेनंतर खारघर पोलिसांनी हाणामारी करणाऱ्या सात कैद्यांविरोधात हाणामारी करणे, दंगल माजविणे अशा कलमाखाली गुन्हे दाखल केले आहेत.

### वाहनचालकांसह पोलिसांचा अनोखा सन्मान



**पनवेल :** क्रांतिज्योत महिला विकास फाउंडेशनतर्फे सालाबादप्रमाणे याही वर्षी थर्टी फर्स्ट डिसेंबर रोजी क्रांतीज्योत महिला विकास फाउंडेशनतर्फे पनवेल येथील आदई सर्कलजवळ वाहतुकीचे नियम पाळणाऱ्या, हेल्मेट घातलेले व सीट बेल्ट लावले आहेत. अशा वाहनचालकांना गुलाबपुष्प देण्यात आले. तसेच पोलीस बांधव-भगिनी थर्टी फर्स्टच्या दिवशी रात्री उशिरापर्यंत ड्युटी करतात त्यांनाही गुलाबपुष्प देण्यात आले. या वेळी संस्थेच्या संस्थापक अध्यक्ष रूपाली शिंदे, सदस्य प्रिया गंगावणे, यामिनी महाजन, स्नेहा धुमाळ, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अधिकारी संजय नाळे, वाहतूक पोलीस अधिकारी कर्मचारी, महिला कर्मचारी आदी उपस्थित होते.

### सोनसाखळी चोरणारे अटकेत

**पनवेल :** सोनसाखळी चोर करणारी दोन विधीसंघर्षग्रस्त बालकांना तुर्भे पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्यांच्या अटकेमुळे अनेक सोनसाखळी चोरीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. तक्रारदार हे कोडा कंपनी समोरील सर्व्हिस रोड, खैरणे एमआयडीसी येथुन स्काय वॉकचे दिशेने पायी जात होते. या वेळी सर्व्हिस रोडने समोरून मोटरसायकलवरून आलेल्या दोन व्यक्तीपैकी पाठीमागे बसलेल्या व्यक्तीने तकारारदार यांचे गळ्यातील मंगळसूत्र जबरदस्तीने खेचुन चोरी केली. या गुन्ह्याच्या तपासात दोन विधीसंघर्षग्रस्त बालकांना कळवा, ठाणे येथुन ताब्यात घेण्यात आले. त्यांनी यापुर्वीही अशा प्रकाराचे चेन जबरदस्तीने खेचल्याचे कबुल केले. विधीसंघर्षग्रस्त बालकांना बालन्यायालय येथे हजर राहण्याची तजबीज ठेवली आहे.

### कोरेगाव भीमा येथे शौर्यस्तंभाला अभिवादन

**पनवेल :** स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांच्या नेतृत्वाखाली पनवेलसह



रायगड जिल्ह्यातील हजारो कार्यकर्त्यांनी कोरेगाव भीमा येथे जाऊन शौर्य स्तंभाला अभिवादन केले आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मनोज संसारे यांच्या मार्गदर्शनानुसार जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांनी मोठ्या प्रमाणात कार्यकर्त्यांना घेऊन कोरेगाव भीमा येथे जाऊन शौर्य स्तंभाला अभिवादन केले आहे. पनवेल परिसरातून जाणाऱ्या अनेकांचे स्वागत महेश साळुंखे यांनी केले. त्यानंतर ते आपल्या कार्यकर्त्यांच्या साथीने कोरेगाव भीमा येथे मार्गस्थ झाले.

## २७ गाव प्रकल्पबाधित कृती समिती प्रलंबित मागण्यांसाठी पुन्हा एकवटली

# सिडकोविरोधात १३ जानेवारीला भूमिपुत्र निर्धार परिषद

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याच्या प्रकल्पग्रस्तांच्या मागणीसह संपादित जमिनीची नुकसानभरपाई आणि अन्य मागण्यासंदर्भात पुष्पकनगर येथील गणेश मंदिरात लोकनेते दि. बा. पाटील २७ गाव प्रकल्पबाधित कृती समितीच्या वतीने पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. या वेळी प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांनी सिडकोविरोधात एल्गार करीत येत्या १३ जानेवारीला भूमिपूत्र निर्धार परिषद आयोजित केल्याची माहिती देण्यात आली.




सिडकोने विमानतळाची कामे जलद गतीने सुरू केली, पण नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळास लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याच्या प्रकल्पग्रस्तांच्या मागणीसह संपादित जमिनीचे नुकसानभरपाई संदर्भातील प्रश्न, पुनर्वसन व पुनर्वसाहत प्रक्रियेतील प्रश्न व इतर प्रश्न सिडकोने अद्यापपर्यंत सोडविलेले नाहीत. त्याप्रमाणे प्रकल्पग्रस्तांच्या इतरही अनेक प्रलंबित मागण्या सिडकोकडे प्रस्तावित आहेत, अशी माहिती या पत्रकार परिषदेत देण्यात आली.

या वेळी २७ गाव कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प हा सार्वजनिक खाजगी भागीदारीमध्ये बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर चिंचपाडा, कोपर, उलवे, तरघर, कोंबडभुजे, वाघिवली वाडा, वाघीवली, वरचे ओवळे, खालचे ओवळे, कोल्ही, पारगाव, दापोली, डुंगी या गावाच्या घरांच्या व शेतांच्या जमिनीवर उभारण्याचे काम सुरू आहे. या प्रकल्प उभारणीत सिडको ही नोडल एजन्सी असून विमानतळ प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सोडविण्याचे काम सिडकोच्या अखत्यारीत आहे.

सिडकोने विमानतळाची कामे जलद गतीने सुरू करून घरांचे व पुनर्वसनाचे प्रश्न प्रलंबित असताना काही प्रकल्पग्रस्तांची घरे जबरदस्तीने जमीनदोस्त केली. प्रकल्पग्रस्तांनी घरे मोडून पुनर्वसन क्षेत्रात घरे बांधण्याकरीता सुरुवात केली असता सिडको पुनर्वसन क्षेत्रामध्ये सोयी सुविधा पुरविण्यास सिडको असमर्थता दर्शवित आहे. विशेष म्हणजे जोपर्यंत घरे खाली होत नव्हती तोपर्यंत प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सोडविण्यास रस असलेले सिडको प्रशासन आता घरे खाली केल्यानंतर प्रश्न सोडविण्यास नकारात्मकता दर्शवित आहे.

या पत्रकार परिषदेला २७ गाव कृती समितीचे अध्यक्ष नंदराज मुंगाजी, कार्याध्यक्ष सुनील म्हात्रे, पंढरीनाथ पाटील, खजिनदार संतोष पवार, उपाध्यक्ष गोवर्धन डाऊर, सी. टी. पाटील, करण भोईर, ॲड. प्रशांत भोईर, सचिव प्रेम पाटील, सहसचिव किरण केणी, चेतन डाऊर, सहखजिनदार कैलास तारेकर, कायदेशीर सल्लागार ॲड. राहुल मोकल, ॲड. प्रदीप मुंडकर, सल्लागार पुंडलिक म्हात्रे, जयवंत परदेशी, गजानन पाटील, विष्णू जितेकर, प्रवक्ते रुपेश धुमाळ, संपर्कप्रमुख किरण पवार, माहिती प्रसारण सुनील कटेकर, उमेश खांदेकर, आरटीआय सेल सचिन कांबळे यांच्यासह कृती समितीचे पदाधिकारी आणि सदस्य उपस्थित होते.

### परिस्थितीनुसार पुढील आंदोलनाबाबत विचार


सिडकोने कामे अगदी जोमाने सुरू केली असली तरीही नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळबाधित प्रकल्पग्रस्तांचे प्रलंबित प्रश्न सोडविण्यात सिडको टाळाटाळ करीत आहे. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांना नाईलाजास्तव आंदोलन करणे भाग पडत आहे. आंदोलनाचा पहिला टप्पा सिडकोच्या या अत्याराचाराच्या निषेधार्थ येत्या १३ जानेवारीला लोकनेते दि. बा. पाटील सर्वपक्षीय कृती समितीच्या अध्यक्षतेखाली भूमिपुत्र निर्धार परिषद तसेच दुसरा टप्पा सिडकोचे लक्ष वेधण्यासाठी २४ जानेवारीला नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळात सुरू असलेली कामे बंद करण्याचे ठरविलेले आहे. त्यानंतर परिस्थितीनुसार पुढील आंदोलनाबाबत विचार करण्यात येईल, अशी माहिती या पत्रकार परिषदेत देण्यात आली.

## पनवेलमध्ये दोन अपघातांत एक ठार, तिघे जखमी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरात झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातात एक ठार आणि तीन जण जखमी झाल्याची घटना घडली आहे.

पनवेलजवळील साईदीप हॉटेलजवळून फिर्यादी सस्मीत डोके (वय ३५, रा.डेरवली) हा शिवनाथ साह (वय ३४, रा. एपीएमसी मार्केट) हे दोघे दुचाकीवरून पनवेल बस डेपो बाजूकडे येत होते. या वेळी अचानक पाठीमागून वेगाने आलेल्या सफेद रंगाच्या कारवरील चालकाने



त्यांच्या गाडीस धडक दिली. यात ते दोघे जखमी होऊन या अपघातात शिवनाथ साह याचा मृत्यू झाला. या घटनेनंतर कारचालक कारसह पळून गेला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

दुसऱ्या घटनेत खांदा वसाहत येथील नवीन पनवेल ते खांदा कॉलनी ओव्हर ब्रीजवरून फिर्यादी स्वाती दास (वय ५५) या रिक्षाचालक विकी गायकवाड (वय २८) याच्या रिक्षातून जात होत्या. या वेळी पुढे चाललेल्या डंपरला रिक्षाने पाठीमागून धडक दिली. या झालेल्या अपघातात हे दोघे जखमी झाले असून रिक्षाचेही नुकसान झाले आहे. या अपघाताची नोंद खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## कोविड नियमांचे उल्लंघनप्रकरणी पनवेल तालुक्यात अडीच लाखांचा दंड वसूल

**पनवेल : वार्ताहर**

शासनाने आखून दिलेल्या कोविड नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी पनवेल तालुक्यात अडीच लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. तहसीलदार विजय तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली मास्क न लावणारे नागरिक तसेच गर्दी करणाऱ्या नागरिकांकडून दंड वसूल केला जात आहे.

काही नागरिक मास्क परिधान करत नाहीत तसेच गरज नसताना अनेक ठिकाणी गर्दी केली जाते. तहसीलदार विजय तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली अशा नागरिकांवर कारवाई करण्यासाठी मंडळ अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक व कर्मचारी यांचे पथक तयार करण्यात आले आहे.

या पथकाने तालुक्यातील दुकाने, गर्दीची ठिकाणे, होलसेल दुकाने, मेडिकल, डेअरी, इतर शॉप या ठिकाणी मास्क परिधान न करणाऱ्या नागरिकांवर दंडात्मक कारवाई केली आहे. यामध्ये अडीच लाखांचा दंड वसूल केला. त्यामुळे नागरिकांनी मास्क परिधान करावा आणि गर्दी करू नये, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

## कराडी समाजाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन



**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

अखिल कराडी समाज महाराष्ट्र ही संघटना कराडी समाजाच्या न्याय हक्कासाठी लढणारी संघटना असून ही संघटना संपूर्ण भारतात कार्यरत आहे. या संघटनेच्या २१व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून कराडी समाजाची २०२२ सालची दिनदर्शिका प्रकाशन अखिल कराडी समाज महाराष्ट्राचे अध्यक्ष महादेव बंडा यांच्या हस्ते करण्यात आली. कोट गावचे आराध्य दैवत श्री राघोबादेव मंदिर, कोटनाका हा कार्यक्रम झाला.

या वेळी महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष महादेव बंडा, कोषाध्यक्ष मधुकर भगत, महाराष्ट्र सचिव विलास पाटील, मुंबई उपाध्यक्ष संतोष माजगावकर, उपाध्यक्ष मनोहर पाटील, पनवेल अध्यक्ष सूरदास गोवारी, उरण अध्यक्ष रमण कासकर, उरण उपाध्यक्ष हरिश्चंद्र पाटील, बांधकाम सभापती गणेश पाटील, उपाध्यक्ष रमेश धुमाळ, चौल विभाग मेघशाम झावरे, श्रीकांत भोईर, दत्ताराम पाटील, शांताराम पाटील, सुनील पाटील (पाणजे),चौल विभाग अध्यक्ष अविनाश भगत, ठाणे विभाग अध्यक्ष विजय मोहिते, खजिनदार मधुकर भगत, सहखजिनदार प्रल्हाद कासकर, कोटगाव ग्रामसुधारणा मंडळाचे अध्यक्ष योगेश गोवारी आणि कराडी समाजाचे बंधु व भगिनी आदी उपस्थित होते.



**पनवेल : भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या शेलघर येथील निवासस्थानी श्री सत्यनारायणाच्या महापूजेचे आयोजन करणात आले होते. या वेळी तालुका चिटणीस नामदेव जमदाडे, बाळाराम ऊसाटकर, रवींद्र पाटील, द्वारकानाथ बोलाडे, भगवान म्हात्रे, बाळू पवार, धनाजी म्हात्रे, जयेश पाटील, दिनेश फडके आदी उपस्थित होते.**

## ‘दिशा’तर्फे गरजू महिलेची मोफत प्रसूती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

’जागर नवदुर्गेचा सन्मान नारिशक्तीचा’ या कार्यक्रमात आपले कर्तव्य समजून दरवर्षी दिशा व्यासपीठ सुचवेल अशा एका गरजू महिलेची प्रसूती यशोदा हॉस्पिटल आणि आयव्हीएफ सेंटर, कामोठे येथे मोफत केली जाईल असे जाहीर केले होते. त्यानुसार गरजू व गरोदर महिलेची नोंदणीकरून यशोदा हॉस्पिटलमध्ये या महिलेची मोफत प्रसुती करण्यात आली.

घरची परिस्थिती तशी बेताचीच असल्याने प्रसुतीचा खर्च झेपणारा नव्हता. अशा वेळेस सुप्रिया या गरजू महिलेची यशोदा हॉस्पिटलमध्ये नोंदणी करण्यात आली. अचानक सुप्रियाच्या पोटात दुखायला लागल्यामुळे यशोदा हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करण्यात आले. नॉर्मल प्रसूती करणे शक्य कसल्याने सिझेरियन शस्त्रक्रिया करण्यात आली. सुप्रियाने एका गोंडस मुलीला जन्म दिला. बाळंतीण व सोन्याच्या पावलांनी आलेली ही लक्ष्मी अगदी ठणठणीत व सुखरूप आहे. सुप्रियासह तिच्या कुटुंबियांनी दिशा व्यासपीठासह हॉस्पिटलमधील स्टाफ, डॉ. बाळासाहेब खडबडे, डॉ. स्नेहलता यांचे आभार मानले.



## नवी मुंबईत रक्तदान शिबिराला प्रतिसाद

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

शिवाई फॅमिली ॲण्ड चाईल्ड केअर क्लिनीक आणि समर्पण ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. २) रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी ९.३० ते दुपारी ३ दरम्यान हे रक्तदान शिबिर पार पडले. या शिबिराला नागरिकांचा चांगला प्रतिसाद लाभला. या शिबिरात एकूण ५३ जणांनी रक्तदान केले.





## ‘द’ दारूचा नाही, तर ‘द’ दुधाचा!

### ‘अंनिस’तर्फे नवी मुंबईत जनजागृती

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (अंनिस) नवी मुंबई जिल्ह्यातील सानपाडा शाखेतर्फे, ‘चला व्यसनाला बदनाम करू’ अभियान नववर्षाच्या पूर्वसंधेला म्हणजे ३१ डिसेंबरच्या सायंकाळी राबविण्यात आले. सानपाडा कै. सिताराम मास्तर उद्यान येथे राबविण्यात आलेल्या या अभियानात सरत्या वर्षाला मद्याच्या पार्ट्या करून निरोप द्यायच्या समाजाच्या मानसिकतेला छेद देत दुधाची पार्टी आयोजित करण्यात आली होती. ‘द’ दारूचा नाही तर ‘द’ दुधाचा, असा संदेश देण्यात आला.



शितल आहेर यांनी मोफत दुधाचे वाटप करताना तरुणांशी मद्यपान केल्याने होणाऱ्या दुष्परिणामांची चर्चा केली. मद्यपान करणाऱ्या व्यक्तीची जबाबदारी नकळत कुटुंबातील महिला सदस्यांवर येते. म्हणून महिलांनी मद्यपानाला कडाडून विरोध केला पाहिजे. मद्य प्यायला हिंमत लागत नाही तर मद्य प्यायला नकार द्यायला हिंमत लागते. तरुणांपुढे पथदर्शक म्हणून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमात ‘नो व्हिस्की नो बियर हॅपी न्यू ईयर’ अशा घोषणा देण्यात आल्या. तरुणांनी दुधाचा आस्वाद घेत कार्यक्रमाला उदंड प्रतिसाद दिला. कार्यक्रमाला साबाजी चौकेकर, अशोक निकम यांनी सहभाग नोंदवला.

## डास निर्मूलन मोहीम राबवा; भाजपची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई मनपा नेरूळ सेक्टर ८ प्रभाग ८७ मध्ये डास र्निमूलन मोहीम, धुरीकरण राबविण्याची मागणी भाजप वार्ड अध्यक्ष ॲड. गणेश रसाळ यांनी महापालिका आयुक्त यांना एका निवेदनात केली आहे.

नवी मुंबई मनपा नेरूळ सेक्टर ८ प्रभाग ८७मध्ये मलेरिया, डेंग्यू व अन्य साथीच्या आजाराचे प्रमाण वाढले आहे. येथे छत्रपती शाहू महाराज आणि भाऊसाहेब शेरे अशी दोन उद्याने आहेत. उद्यानात सकाळी आणि सायंकाळी फेरफटका मारण्यासाठी आलेल्या नागरिकांना डासाशी सामना करावा लागतो. विशेषतः सायंकाळी रात्री डासांचा उपद्रव खूपच असतो.

प्रभागात डासांची घनता वाढली असून स्थानिक रहिवाशांना त्यामुळे साथीच्या आजाराचा सामना करावा लागत आहे. साथीचा आजार उपचार घेणाऱ्या व्यक्तीबाबत पालिका प्रशासनाला काहीही माहिती नसल्याने साथीच्या आजाराचे गांभीर्य त्यांच्या निदर्शनास येत नाही. या प्रभागात डासांचा उद्रेक संपुष्ठात आणण्यासाठी सातत्याने व्यापक प्रमाणावर डास निर्मूलन मोहीम, औषध फवारणी, धुरीकरण राबविणे आवश्यक आहे. सिडको सोसायटी आवारात, एलआयजीच्या अंतर्गत भागात धुरीकरण करण्यासाठी संबंधितांना निर्देश द्यावेत, असे ॲड. रसाळ यांनी दिलेल्या निवेदनात नमुद केले आहे.

## संपादकीय

# वर्षारंभीही चिंता कायम

जुने वर्ष सरून नवे वर्ष सुरू झाले आहे. यंदा नववर्षाच्या स्वागताचा तितकासा उत्साह दिसून आला नाही. याचे कारण दुसरे तिसरे काहीही नसून कोरोना हेच आहे. गेली दोन वर्षे या वैश्विक महामारीने जगभर वाताहत केली असून हे संकट थांबायचे नाव घेत नाहीए. उलट नवनवी रूपे घेऊन कोरोना डोके वर काढत आहे. त्यामुळे चिंता कायम आहे.

**२०२१ या वर्षाला निरोप देऊन सर्वांनी २०२२ सालामध्ये प्रवेश केलेला आहे. तसे पाहिले तर गेली दोन वर्षे अवघ्या मानवजातीने अतिशय बिकट परिस्थितीत काढली आहेत. सन २०२०पासून जगावर कोरोनाचे संकट घोंघावू लागले आणि बघता बघता त्याने अवघ्या जगाला आपल्या कवेत घेतले. त्यानंतर जे काही होत गेले ते केवळ हतबलतेने पाहत राहण्यावाचून सुरुवातीच्या काळात दुसरा काही मार्ग नव्हता. अगदी अमेरिका, ब्रिटन, रशिया यांच्यासारखी बलाढ्य राष्ट्रदेखील कोरोनाच्या लाटेत अक्षरश: वाहून गेली. त्यानंतरही कोरोनाच्या लाटा येत राहिल्या आणि त्याचा परिणाम सर्वच क्षेत्रांवर जाणवला. आपल्या देशातही आतापर्यंत कोरोनाच्या दोन लाटा येऊन गेल्या आहेत. आता जगभरात कोरोनाचा नवा विषाणू ओमायक्रॉनचा प्रादूर्भाव सुरू झालेला आहे. भारतातही याचे रुग्ण आढळत आहेत. एकीकडे मूळ कोविड-१९ने पुन्हा एकदा डोके वर काढले असताना नवा उत्प्रेरक ओमायक्रॉनही हात पाय पसरू लागल्याने चिंता व्यक्त होत आहे. देशात यापूर्वी कोरोनाचे दैनंदिन पाच हजार रुग्ण आढळत होते. तो आकडा सध्या २० हजारांच्या पार गेलाय. सक्रिय रुग्णांची संख्या एक लाखाच्या आहे. कोरोनामुळे जीव गमावणाऱ्यांची संख्या सुमारे पाच लाखांच्या घरात पोहचली आहे. दिलासादायक बाब म्हणजे आतापर्यंत सुमारे साडेतीन कोटी लोक संसर्गमुक्त झाले आहेत. दुसरीकडे देशभरातील ओमायक्रॉनबाधितांची संख्या १५२५वर पोहचली आहे. गंभीर म्हणजे कोरोनाप्रमाणेच ओमायक्रॉन रुग्णांची सर्वाधिक संख्या महाराष्ट्रात आहे. त्यामुळे दुहेरी कसोटी आहे. अशा परिस्थितीत या संकटाविरोधात नेटाने लढा देणे अपेक्षित असताना राज्यात तीन दिशेला तोंडे असणारे सरकार सत्ता उपभोगण्यात मश्गूल आहे. यांना जनतेचे काही एक घेणेदेणे नाही. केवळ स्वार्थ जपण्यात ही मंडळी गुंग आहेत. सुदैवाने भारताला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सक्षम व खंबीर नेतृत्व लाभले आहे. ते केंद्रीय पातळीवरील सर्व यंत्रणा कामाला लावून कार्यरत आहेत. त्यांनी कोरोनावरील लसी, औषधे उपलब्ध करून दिली आहेत. देशात आतापर्यंत १४५.१६ कोटी लसीचे डोस देण्यात आले आहेत. सोमवारपासून १५ वर्षांखालील मुलांच्या लसीकरणाला सुरुवात होत आहे. त्यानंतर आरोग्य कर्मचारी, ज्येष्ठांना बूस्टर डोस दिला जाणार आहे, पण हे सर्व आहे म्हणून बेफिकीरपणा चालणार नाही. कोरोना महामारी सहजासहजी संपुष्टात येईल असे दिसत नाही. त्यामुळे मास्क, सामाजिक अंतर आणि स्वच्छता यांचा अंगीकार यापुढील काळातही करावा लागणार आहे. कोरोना रुग्णसंख्या आटोक्यात आल्यापासून अनेक लोक नियमांचे सर्रास उल्लंघ करीत असल्याचे पाहावयास मिळत आहे. काहींच्या तोंडांवरून मास्क गायब झाला आहे. असे कसे चालेल? काही गोष्टी पाळाव्याच लागतील. नाही तर कोरोना काही पाठ सोडणार नाही. ज्यांना हे उमगले ते सुरक्षित जीवन जगत आहेत आणि ज्यांना हे सांगूनही कळत नाही ते मात्र स्वत:चा जीव धोक्यात घालून इतरांनाही हानी पोहचवत आहेत. नवे वर्ष आनंदाने घालवायचे असेल तर काळजी आणि सर्तकता बाळगावीच लागेल हे वेगळे सांगायला नको!**

# ग्रीन हायवेसाठी त्रुटी दूर करणे आवश्यक



केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी राष्ट्रीय महामार्ग ५४८अ हा ग्रीन हायवे बनविण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र त्या रस्त्याबाबत अनेक त्रुटी असून त्या दूर करण्याची आवश्यकता आहे.

शहापूर-मुरबाड-कर्जत-खोपोली या राष्ट्रीय महामार्गाच्या बांधणीबाबत अजूनही स्थानिक बाधित शेतकरी चिंतेत आहे. राष्ट्रीय महामार्ग ५४८अ हा कर्जत तालुक्यातून जात असून नाशिक-मुंबई राष्ट्रीय महामार्गावर शहापूर येथून सुरू होत आहे. शहापूरपासून कर्जत आणि पुढे जेएनपीटी बंदर असा हा प्रस्तावित महामार्ग ५३ किलोमीटर लांबीचा असून सर्व रस्ता आरसीसी काँक्रीटचा होणार आहे. या रस्त्याचा कर्जत तालुक्यातील भाग ५३ किलोमीटर लांबीचा आहे. प्रस्तावित१० मीटर रुंदीचा रस्ता आरसीसी काँक्रीटचा बनविला जाणार आहे. या राष्ट्रीय महामार्ग दर्जाच्या रस्त्यामुळे मोठ्या प्रमाणात रस्त्यालगतची गावे, शेती, बाजारपेठ बाधित होणार आहे. शेती, त्यांची घरे बाधित होणार असल्याने भरपाई मिळाली पाहिजे, अशी मागणी केली. त्यानंतर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणचे कार्यकारी अभियंता संजय गोसावी यांच्याकडे रस्त्याचे काम यांच्याकडे शेतकऱ्यांनी कळंब येथे बैठक घेऊन केली होती. १० मीटरचे आरसीसी काँक्रीटचा रस्ता बनविला जाणार असून त्याच्या दोन्ही बाजूला प्रत्येकी दोन मीटर लांबीची साईडपट्टी असणार आहे. त्याच वेळी रस्त्याच्या दोन्ही बाजूला एक मीटर जागा ही झाडे लावण्यासाठी आरक्षित ठेवली जाणार असून त्यात झाडे उभी करून ग्रीन हायवे करण्याचा केंदीय मंत्री नितीन गडकरी यांचा मानस आहे.

शहापूर-मुरबाड-कर्जत-खोपोली हाळ फाटा असा नवीन राष्ट्रीय महामार्ग बनविला जात आहे. आरसीसी काँक्रीटचा तो नवीन मार्ग असून उपलब्ध जागेनुसार रस्ता बनविला जात आहे. पूर्वी मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरणमधून हाळ फाटा ते कर्जत आणि पुढे कल्याण असा रस्ता दुपदरी करण्यात आला होता. त्यामुळे अपवाद वगळता या रस्त्याचे जुन्या रस्त्यावरच राष्ट्रीय महामार्ग म्हणून काँक्रीटीकरण सुरू आहे, मात्र या रस्त्याचे काम पाहणाऱ्या राज्य रस्ते विकास महामंडळ म्हणजे एमएसआरडीसीने काम उरकण्यावर भर दिला आहे असे दिसून येत आहे. कारण त्या रस्त्यात येणाऱ्या अडचणीदेखील एमएसआरडीसीकडून सोडवल्या जात नाहीत असे दिसून येत आहे. त्यामुळे रस्ता जरी नव्याने होत असला, तरी त्या रस्त्यामुळे पूर्वी असलेल्या समस्या आणि अडचणी यांना सामोरे जातच रस्त्यावर प्रवास करावा लागत आहे. या दुपदरी रस्त्यावर कर्जतपासून पुढे खोपोलीकडे जात असताना अनेक ठिकाणी विजेचे खांब उभे आहेत. हे विजेचे खांब खोपोली येथून कर्जतसाठी जी मुख्य वीजवाहिनी येते त्या वीजवाहिनेचे खांब आहेत. त्यात अनेक खांब हे रस्त्याच्या मधोमध असून त्या खांबांवर रात्री प्रवास करणारे वाहनचालक धडकून पडू शकतात आणि मोठ्या अपघाताला त्या वाहनचालकांना सामोरे जावे लागू शकते. रस्त्याच्या मधोमध ते खांब असल्याने वाहनचालक यांना या रस्त्यावर उभे असलेले विजेचे खांब समजत नाहीत. हे लक्षात घेऊन रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदाराने त्या ठिकाणी रेडियमच्या पट्ट्या लावून माहिती देणे आवश्यक होते, त्याच वेळी अलीकडे माहिती फलक लावण्याची गरज होती, मात्र तशी कोणत्याही स्वरूपातील खबरदारी घेण्यात आली नाही. त्याच वेळी रस्त्यावर गेल्या वर्षापासून काँक्रीटीकरणाचे काम सुरू असून रस्त्यात अडथळा ठरणारे विजेचे खांब हलविण्याचा प्रयत्न देखील रस्ते विकास महामंडळ यांच्याकडून केला गेला नाही. त्यामुळे त्या विजेच्या खांबांना धडकून अपघात होण्याची शक्यता अधिक आहे.

कर्जत-मुरबाड या राष्ट्रीय महामार्गाचे बांधकाम राज्य रस्ते विकास महामंडळ करीत आहे. या रस्त्यावर आरसीसी काँक्रीटीकरण करताना राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्याकडून अनेक ठिकाणी १० मीटर लांबीचे भाग बनविण्यात आले नाहीत, परिणामी त्या रस्त्यावर रात्रीच्या वेळी प्रवास करणारे वाहनचालक हे जीव धोक्यात घालून प्रवास करीत आहेत. दरम्यान, या राष्ट्रीय महामार्गावर अर्धवट कामे तेहवली असतानादेखील त्याबाबत राज्य रस्ते विकास महामंडळाला कोणतेही देणेघेणे नसल्याचे दिसून येत असून त्या त्या ठिकाणी रस्ता बंद आहे, असे फलक लावण्याचे सौजन्यदेखील रस्ते विकास महामंडळ दाखवताना दिसत नाही. कर्जत तालुक्यातून जाणाऱ्या कर्जत-मुरबाड रस्त्याचा ५२ किलोमीटर लांबीचा रस्ता कर्जत तालुक्यातून जातो. हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग ५४८अ चा भाग असून या रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्याकडून केले जात आहे.

**खबरबात**
**संतोष पेरणे**

रस्त्यावर अचानक येणारे खड्डे यामुळे वाहनांचे दररोज अपघात होत आहेत. हे १० मीटर लांबीचे रस्ते वाहनचालक यांच्यासाठी मृत्यूचे सापळे समजले जात आहेत. रात्रीच्या वेळी कमी प्रकाश देणारे विजचे दिवे असलेल्या वाहनचालक यांना अपघातास कारणीभूत असलेले हे खड्डे रस्ते विकास महामंडळांने बनविले आहेत काय? असा प्रश्न वाहनचालक व्यक्त करीत आहेत.

मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गावरून येणाऱ्या वाहनांसाठी शहापूर तालुक्यातील वशेणी येथून मुरबाड-कर्जत-खोपोली वाकण असा राष्ट्रीय महामार्ग तयार होत आहे. ग्रीन हायवे म्हणून नियोजित असलेल्या महामार्ग रस्त्याचे बांधकाम महाराष्ट्र सरकारच्या राज्य रस्ते विकास महामंडळाकडून केले जात आहे. काँक्रिटच्या रस्त्याला भेगा पडणे, रस्त्यातील काँक्रिट बाहेर येणे, रस्त्याचा भाग खचून सपाट रस्त्यावर खोलगट भाग तयार होणे असे प्रकार घडले. काँक्रिटचा रस्ता बनला असला तरी या रस्त्याने वेगाने वाहने चालवणे धोक्याचे झाले आहे. रस्ता एकसंघ बनवला गेला नसल्याने रस्त्यावर ८० किमी वेगाने वाहने जात असताना समुद्रातील लाटाप्रमाणे वाहने वर-खाली होतात.

मुंबई-पुणे समृद्धी महामार्गासाठी कनेक्टिव्हीटीसाठी बनविण्यात आलेल्या शहापूर-मुरबाड-कर्जत-खोपोली या राष्ट्रीय महामार्ग ५४८अ चे कर्जत तालुक्यातील आणि खालापूर तालुक्यातील काम अर्धवट आहे. कर्जत तालुक्यात मुरबाड तालुक्यात बाटलीचीवाडी येथे हा रस्ता प्रवेश करीत असतो तर डोलवली येथे हा रस्ता खालापूर तालुक्यात प्रवेश करतो. कर्जत तालुक्यातून साधारण ५२ किमीचा रस्ता असून खालापूर तालुक्यात खोपोली येथे हा रस्ता पुढे पाली रस्त्याने वाकण येथे हा रस्ता पनवेल-गोवा राष्ट्रीय महामार्गाला जाऊन मिळतो. कर्जत तालुक्यात कळंब येथे दोन ठिकाणी या रस्त्याचे काम अर्धवट आहे. त्याच वेळी पुढे सुगवे गावाजवळ देखील चिल्लार नदीच्या पुलाच्या दोन्ही बाजूला हा रस्ता अर्धवट आहे. कर्जत तालुक्यातील नांगुर्ले गावाजवळ देखील हा रस्ता स्थानिकांनी बांधकाम करू न दिल्याने अर्धवट आहे. तर पळसदरीच्या वळणावर देखील रस्त्याचे काम झालेले नाही. तर पळसदरीपासून पुढे रस्त्याच्या एका लेनचे काम झाले नाही. तेथे स्थानिक वाहनचालक यांना अपघात होण्याची शक्यता असून मानकीवली गावाच्या पुढेदेखील हाळ फाट्यापर्यंतचा रस्ता काँक्रीटीकरण झालेला नाही.

असे असताना देखील महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्याकडून रस्त्यावर वाहनांसाठी टोल लावण्याची धडपड सुरू आहे. पळसदरी येथे एमएसआरडीसीकडून टोल नाका बनविण्याचे काम सुरू आहे, तसेच कर्जत तालुक्यातील भागूचीवाडी उताराजवळ देखील एमएसआरडीसीकडून टोलनाका उभारण्याच्या हालचाली सुरू आहेत. ३५ किलोमीटर नंतर एक असे टोलनाके बनविले जात असतात, त्यामुळे शहापूर-मुरबाड-कर्जत-खोपोली या राष्ट्रीय महामृगी रस्त्यावर टोलनाके बनविले जाणार आहेत, मात्र कर्जत तालुक्यातील या राष्ट्रीय महामार्ग रस्त्याचे अंतर लक्षात घेता दोन टोलनाके बनवले जाणे हे कर्जत तालुक्याच्या वाहनांना आर्थिक भुर्दंड देणारे आहे. त्यात ५२ किमीचा रस्ता कर्जत तालुक्यातून असताना या अंतरात दोन टोलनाके ही बाब चुकीची असून रस्त्याचे काम अर्धवट असताना दोन दोन टोलनाके ही कर्जत तालुक्यातील वाहनांवर अन्याय करणारी बाब आहे.

# सुधागड तहसील कार्यालयात महिलांना सुरक्षा व कायदेविषयक मार्गदर्शन

(छाया: धम्मशील सावंत)



**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांच्या मार्गदर्शनाखाली पाली पोलिसांकडून महिलांना कायदेविषयक मार्गदर्शन करण्यात आले. या वेळी नायब तहसीलदार वैशाली काकडे, महिला पोलीस कर्मचारी मनीषा लांगी, रेखा म्हात्रे, स्वप्नाली म्हात्रे या प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होत्या. महिलांची सुरक्षा व सक्षमीकरणावर प्रत्येक विभागात भर दिला जातोय. महिला सुरक्षेसंदर्भात पोलीस प्रशासनाच्या माध्यमातून युवती व महिलांना आवश्यक ती माहिती व जनजागृती करण्यावर भर दिला आहे.

या कार्यशाळेचा महिलांना मोठ्या प्रमाणावर लाभ होत असून स्वयंसुरक्षेच्या दृष्टीने महिला अधिकाधिक सजग व जागरूक होत आहेत. सुधागड तहसील कार्यालयात ही कार्यशाळा घेण्यात आली. या वेळी महिला अत्याचारविरोधी कायदेविषयक माहितीचे मार्गदर्शन करण्यात आले. या वेळी उज्ज्वला भोईर, पुरवठा अव्वल कारकून सुमिता डाके, सरला कराळे, सौ. म्हात्रे आदी उपस्थित होते.

# मुंबई-पुणे महामार्गावर कारला अपघात

## पाच जण गंभीर जखमी




**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे महामार्गावर माडप बोगद्याजवळ, पुणे दिशेच्या लेनवर पुढे जाणाऱ्या टँकरला मागून सीलेरिया कारने जोरदार धडक दिल्याने अपघात झाला. या अपघातात कारमधील पाच जण जखमी झाले. जखमीत एका महिलेचा समावेश आहे. सर्व जखमींना लोकमान्य पुणे येथे रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

मुंबईहून पुणेकडे एमएच ०२-८४८७ सीलेरिया कार जात असताना, खालापूर तालुका हद्दीत कारने पुढे जाणाऱ्या आर जे २५ जीए २९११ या क्रमांकाच्या टँकरला मागून जोरदार धडक दिल्याने गंभीर अपघात होऊन यात राजेंद्र माणिक (५६, लोकमान्य नगर ठाणे), वर्गीस प्रकाश (३०, ठाणे), शुभम सिंग (२४, भोसरी पुणे), मुकेंद्र सुतार (२७, कणकवली, सिंधुदुर्ग) हे प्रवासी गंभीर जखमी झाले. सर्व जखमींना लोकमान्य पुणे रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. जखमींमध्ये एक महिला प्रवासी आहे, पण त्यांचे नाव अद्याप समजले नाही. सर्व प्रवासी शेअरिंग पद्धतीने मुंबईहून पुण्याला प्रवास करीत होते. या घटनेबाबत खालापूर पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे, पुढील तपास सुरू आहे.

# कुरूळ पोस्टातील कर्मचाऱ्याविरोधात डाक अधीक्षकांकडे तक्रार दाखल

**अलिबाग : प्रतिनिधी**

बचत खाते अपडेट करण्यासाठी कुरुळ येथील पोस्ट कार्यालयात गेलेल्या ज्येष्ठ पत्रकार मानसी चेऊलकर यांच्याशी तेथील महिला कर्मचाऱ्याने उद्धट वर्तन केले. त्यामुळे संतप्त झालेल्या चेऊलकर यांनी सदर महिला कर्मचाऱ्याविरोधात डाक अधीक्षकांकडे लेखी तक्रार केली आहे.

अलिबाग तालुक्यातील कुरुळ येथील पोस्ट कार्यालयात मानसी चेऊलकर यांचे बचत खाते आहे. त्या खात्यात पैसे भरण्यासाठी त्यांनी त्यांच्या आर. डी. एजंटला सांगितले होते, पण वनिता लभाणे यांनी पैसे भरणा करण्यास नकार दिला, बचत खातेदेखील अपडेट करून दिले नाही. त्यामुळे मानसी चेऊलकर स्वतः बुधवारी बचत खाते अपडेट व अन्य कामासाठी कुरुळ येथील पोस्ट कार्यालयात गेल्या होत्या. त्या वेळी तेथील उपस्थित लोकांसमोर महिला कर्मचारी वनिता लभाणे यांनी चेऊलकर यांना अपमानास्पद वागणूक देऊन उद्धट वर्तन केले. त्यामुळे संतप्त झालेल्या चेऊलकर यांनी वनिता लभाणे यांच्या विरोधात डाक अधीक्षक रायगड यांच्याकडे लेखी तक्रार केली आहे. दरम्यान, वनिता लभाणे यांच्याशी संपर्क न झाल्याने त्यांची प्रतिक्रिया समजू शकली नाही.

## देशी दारू विक्री करणारे अटकेत

**पेण :** तालुक्यातील हेमडी गावच्या हद्दीत रविवारी सायंकाळच्या सुमारास पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार दोन व्यक्ती रोडलगत असणाऱ्या नक्ष चायनीज कॉर्नरमध्ये देशी दारू विनापरवाना बाळगले स्थितीत आढळून आले. याबाबत पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस नाईक बेल्हेकर करीत आहेत.

# बँक सुरक्षा कर्मचारी अशोक सालकर सेवानिवृत्त



**खोपोली : प्रतिनिधी**

डोंबिवली सहकारी बँकेच्या खोपोली शाखेतील सुरक्षा कर्मचारी अशोक सालकर हे ३० वर्षांच्या सेवेनंतर शुक्रवारी (दि. ३१) निवृत्त झाले. त्यांना खोपोली शाखेमध्ये शाखा व्यवस्थापक प्रकाश खाडिलकर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन निरोप देण्यात आला. या वेळी त्यांच्या पत्नी प्रमिला सालकर व कन्या पायल सालकर उपस्थित होत्या. त्यांचाही भेटवस्तू देऊन बँकेतर्फे सन्मान करण्यात आला.

सैन्य दलात सेवा दिल्यानंतर अशोक सालकर डोंबिवली बँकेत रुजू झाले. त्यांनी सेवानिवृत्त होईपर्यंत चांगल्या प्रकारे जनसंपर्क ठेवला, असे शाखा व्यवस्थापक खाडिलकर यांनी या वेळी सांगितले. पत्रकार जयवंत माडपे व इतर मान्यवरांनीही या वेळी आपले विचार व्यक्त केले. स्वाती घांग्रेकर, प्रांजळ मिसाळ, विनया दातार, प्रणव निकम, सुभाष पाटील, शंकर कोठरे यांच्यासह अनेक बँक ग्राहक या वेळी उपस्थित होते.

# कर्जतमध्ये मशाल मिरवणूक; हुतात्म्यांना अभिवादन



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील हुतात्मा वीर भाई कोतवाल आणि हुतात्मा हिराजी पाटील यांच्या बलिदान दिनानिमित्त कर्जतमध्ये हुतात्मा स्मृती समितीच्या वतीने मशाल मिरवणूक काढण्यात आली. त्याचबरोबर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी तालुक्यातील माजी सैनिकांनी आपले अनुभव सांगून उपस्थितांच्या डोळ्यात पाणी आणले.

कर्जतच्या टिळक चौकात हुतात्मा बलिदान दिनाचे आयोजन करण्यात आले होते. महादेव जुन्नरकर यांच्या हस्ते हुतात्मा भाई कोतवाल आणि हुतात्मा हिराजी पाटील यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. निवृत्त सैनिक विनायक उपाध्ये, भगवान शिंदे, धुळे, नितीन शिंदे यांच्या हस्ते पहाटे क्रांती ज्योत प्रज्वलित करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

मिरवणूक टिळक चौकात आल्यानंतर शुभम ढाकवळ या तिसऱ्या इयत्तेत शिकणाऱ्या व सृष्टी ढाकवळ या आठव्या इयत्तेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी हुतात्म्यांच्या कार्याची माहिती सांगितली. निवृत्त सैनिक विनायक उपाध्ये, भगवान शिंदे, दगडू धुळे यांनी सीमेवरील आपले अनुभव सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय कोंडीलकर यांनी केले, तर आभार श्रीकांत आगीवले यांनी मानले.

या वेळी महेंद्र चंदन, अनिल भोसले, निवृत्ती ढाकवळ, सुधीर कांबळे, सुनील आढाव, दीपक पवार, दीपक भालेराव, शशिकांत मंडलिक, संतोष ऐनकर, चंद्रशेखर जुईकर, रवींद्र सोनवणे, अ‍ॅड. भारती ढाकवळ, प्रभाकर आसवले आदींसह कर्जतमधील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# घोडेवाल्यांच्या दोन गटांत हाणामारी

**माथेरान : प्रतिनिधी**

नववर्षाच्या स्वागतासाठी माथेरानमध्ये पर्यटकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ सुरू असताना पहिल्याच दिवशी पर्यटकांना घोड्यावरून फिरवण्यासाठी येथे व्यवसाय करत असलेल्या अश्वपालकांमध्ये हानामारी झाली. त्यामुळे येथील प्रवेशद्वार असलेल्या दस्तुरी नाक्यावर आलेल्या पर्यटकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण होते. या हाणामारीत काही जण किरकोळ जखमी, तर दोन जण गंभीर जखमी आहेत.

घटनेतील जखमी असलेले लक्ष्मण आखाडे, तुषार आखाडे, राम आखाडे, गणेश शिंगाडे, नरेश आखाडे, सुरेश आखाडे या सर्वांना नेरळ येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. यातील सुरेश आखाडे यांच्या डोळ्याला गंभीर दुखापत झाली असून नरेश आखाडे याच्या देखील डोक्यात दगड बसल्यामुळे पाच ते सहा टाके बसले आहेत. या घटनेमुळे पर्यटनस्थळ म्हणून प्रसिद्ध असलेल्या माथेरानच्या प्रतिमेला येथे व्यवसाय करत असलेल्या घोडेवाल्यांकडून वारंवार धक्का पोहोचवला जात आहे.

## निवडक

### रामवाडीत बाचाबाचीतून एकास मारहाण

**पेण :** रामवाडी येथे शाब्दिक बाचाबाचीतून एकास मारहाण केल्याची घटना घडली आहे. तक्रारदार हे त्यांच्या आईला बोलवण्यासाठी बहिनीच्या घरी गेले असता आईने त्याच्या सोबत येण्यास नकार दिला. त्यानंतर आरोपी (रा. म्हात्रे चाळ, रामवाडी)ने तक्रारदारास मी तुझा आईचा सांभाळ करतो तिला तुझाकडे पाठविणार नाही. यावरून तक्रारदार व आरोपी यांच्यात बाचाबाची झाली. तक्रारदार पोलीस ठाण्यात येत असताना आरोपीने त्यास हाताबुक्याने मारहाण करून शिवीगाळी केली व लाकडी दांडका फिर्यादीच्या डोक्यात मारून दुखापत केली. याबाबत पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास महिला पोलीस नाईक पाटील ह्या करीत आहेत.

### दीवजवळ दुचाकीस्वाराला लूटले

**पेण :** दीव गावाजवळ मोटरसायकलवरून जाणाऱ्या एकाला अज्ञात व्यक्तीने खाली पाडून त्याच्याजवळील पाच हजार रुपये रोख रक्कम घेऊन पोबारा केला आहे. तक्रारदार (रा. जणवली बेडी वढाव, पेण) व त्यांचे वडील सुभाष पाटील हे त्यांच्या मोटरसायकलने दीव गावात जात होते. या वेळी येथील लक्ष्मी नारायण मंदिराजवळ अज्ञाताने त्यांचे टीशर्टची कॉलर धरून मोटरसायकलवरून खाली खेचुन पाडले. तसेच त्यांच्या पँटच्या खिशातुन बळजबरीने पाच हजार रुपये काढुन घेऊन पळ काढला. याबाबत वडखळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास उपनिरीक्षक भोर हे करीत आहेत.

# महड ‘गुरचरण’ला अतिक्रमणाचा विळखा

## ■ प्रशासनाचे दुर्लक्ष; तक्रारी करूनही कारवाई नाही ■ स्थानिकांना आरोप

**खोपोली : प्रतिनिधी**

अष्टविनायकापैकी एक असलेले तीर्थक्षेत्र महड हद्दीतील गुरचरण जागेत झालेले अतिक्रमण त्यामुळे भविष्यात महडच्या विकासाला बाधा येणार आहे. अनेकदा तक्रारी उपोषण करूनसुद्धा ठोस कारवाई झालेली नाही, असे येथील स्थानिकांचे म्हणणे आहे.



अष्टविनायकापैकी एक असलेल्या खालापूर तालुक्यातील महड गावातील गुरचरण जागेची मोठ्या प्रमाणात विक्री करण्यात आली असून, विशेष म्हणजे खरेदी खत होत नसताना, केवळ हमीपत्रावर लाखोंचे व्यवहार झाले आहेत. खालापूर नगरपंचायत हद्दीत महड गाव येत असून अष्टविनायापैकी एक वरदविनायकाचे मंदिर ह्या ठिकाणी आहे. जवळपास शंभर एकरच्या वर गुरचरण जागा आहे. महड साजगाव रस्त्यावर असलेल्या गुरचरण जागेत बेकायदेशीरपणे चाळी, फार्महाऊस व बंगले बांधण्यात आले आहेत. महडमध्ये गुरचरण विक्री करणारी दलालांची टोळीने गुरचरण जागा विकण्याचा सपाटाच लावला होता. पन्नास हजार ते साडेतीन लाखापर्यंत गुंठ्याला भाव घेऊन सरकारी व बिनसरकारी गुरचरण जागेची विक्री होत असून, महड गावात बाहेरून आलेल्या व्यक्तींनी मोठ्या प्रमाणात जागा खरेदी करून बंगले तसेच चाळी बांधल्या आहेत.

> **बाहेरील विघातक प्रवृत्तींना आमंत्रण**
>
> ***बाहेरील विघातक प्रवृत्तींना एकप्रकारे आमंत्रण देवून देवस्थानाच्या सुरक्षेला धक्का लावण्याचे प्रकार सुरू असून २०१८मध्ये तत्कालीन जिल्हाधिकारी विजय सुर्यवंशी यांनी दखल घेतली असून लवकरच बैठक घेऊ असे सांगितले होते, परंतू पुढे काहीच कारवाई झाली नाही. महडमधील बेकायदेशीरपणे करण्यात आलेल्या बांधकामांना देण्यात आलेल्या असेसमेंट उताऱ्यावर नगरपंचायतीकडून अनधिकृत असा शिक्का मारला जात असल्याचे स्थानिकांचे म्हणने आहे.***

नगरपंचायत अस्तित्वात येण्यापूर्वी आवश्यक त्या परवानगी दलाल मिळवून द्यायचे. पाणी, वीजसारख्या सुविधा मिळत असल्यामुळे अनेकांनी जागा खरेदी केली आहे. जवळपास सव्वातीनशे बेकादेशीर घरे महड गुरचरण जागेतउभी राहिली असून या लाख ते दिड लाख रुपये गुंठा या दराने स्वस्त किमतीत जागा मिळतात. त्यामुळे असल्याने बाहेरिल व्यक्तींनी मोठ्या प्रमाणात जागा खरेदी केल्या आहेत. वीज मीटरसह, पाणी, रस्ते अशा विविध सुविधा दलाली घेऊन उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. स्थानिकांना वीज मीटरसाठी चकरा मारूनसुद्धा अनेकदा कामे होत नाहीत. अशा परिस्थितीत बाहेरील व्यक्तीला सहज सोयी सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या प्रशासनाचीदेखील मिलिभगत असल्याचा आरोप स्थानिक करीत आहेत. जागा विक्री करताना कोणतीही शहानिशा केली जात नसून परप्रांतातील व्यक्तींनादेखील जागा विक्री करण्यात आली आहे. काही वर्षांपूर्वी बांगलादेशी महिलेला गुरचरणात जागा विक्री करण्यात आले होते. त्यावेळी जागरुक नागरिकांनी विरोध केल्यामुळे धागा खरेदी रद्द झाली होती.

दरम्यान, ही गुरचरण जागा महसूल विभागाच्या अंतर्गत येत असल्याने यासंदर्भात प्रस्तूत प्रतिनिधीने खालापूरचे तहसीलदार आयूब तांबोळी यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क केला असता त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.

## पेणमध्ये कारची टेम्पोला धडक; तीन जण जखमी

**पेण : प्रतिनिधी**

पेण-खोपोली रस्त्यावर वरसई गावच्या हद्दीत कार व टेम्पोची धडक होऊन या अपघातात तीन जण जखमी झाल्याची घटना घडली आहे.

शुक्रवारी (दि. ३१) सायंकाळच्या सुमारास टेम्पोचालक त्याच्या ताब्यातील टेम्पो (एम.एच.१२/५ एक्स ६४८२) हा पेण ते पुणे चालवित घेऊन जाताना पेण-खोपोली रोडवरील वरसई गावच्या हद्दीतील वॉशिंग सेंटरजवळ ब्रिझ्झा कार (एम. एच. ०६ बीयु-७३७१) वरील चालकाने टेम्पोला समोरून धडक दिली. या अपघातामध्ये ब्रिझाकारमधील चालक व मालक यांना व फिर्यादी यांना दुखापती झाल्या असुन दोन्ही वाहनाचे नुकसानीस कारणीभुत झाला.

या अपघातामध्ये नबिलाल बाबुलाल शेख (वय ५५, थेऊर, जि. पुणे) दिनेश सत्यनारायण अग्रवाल (वय ५१, रा. पोयनाड, ता. अलिबाग) सतिश हरिश्चंद्र जुईकर (वय ६२, रा. शहाबाज ता. अलिबाग) हे जखमी झाले असून पेणमधील म्हात्रे हॉस्पिटल येथे उपचार घेत आहे. याबाबत पेण पोलीस ठाण्यात कार चालकाविरोधात गुन्हा रजि.३/२०२२ कलम ३३७,३३८ दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस नाईक कौशिक फेंगडु हे करीत आहे.

## ‘रोटरी’तर्फे स्वच्छता मोहिमेतून नववर्षाचे स्वागत

**अलिबाग : प्रतिनिधी**

रोट्रॅक्ट क्लब ऑफ अलिबाग सीशोअरच्या माध्यमातून नवीन वर्षाचे स्वागत स्वच्छता मोहिम राबवित केली. या वेळी त्यांनी अलिबाग समुद्रकिनारी क्रीडाभुवन येथे कचरा गोळा करुन नगरपालिकेच्या स्वच्छता आणि आरोग्य विभागाकडे सुपूर्द केला.



अलिबाग शहरातील रोट्रॅक्ट क्लब ऑफ अलिबाग सीशोअरच्या माध्यमातून शनिवारी नवीन वर्षाची सुरवात स्वच्छता मोहिमेतून करायचा निर्धार डॉ. शिवपाल तिवारी यांच्या संकल्पनेतुन या मोहिमेचा शुभारंभ अलिबाग समुद्रकिनार्यारील क्रीडाभुवन येथील स्वच्छता करून नवीन वर्षाची सुरुवात करण्यात आली.

या वेळी तन्वी शेटये हिने सूत्रसंचलन केले. डॉ. तिवारी आणि रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ राजेंद्र चांदोरकर यांनी स्वच्छतेबद्दल थोडक्यात माहिती दिली. प्रतिक पाटील याने उपस्थितांचे आभार मानले. या स्वछतेसाठी अंकुश पाटील, कुमार जोगळेकर, सिंपल सहानी उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नेहारिका घोसाळकर, ओंकार घोसाळकर, संतोष कांबळेकर, तेजस पानकर, प्रीती वंजारी, विद्या साळुंके, रुपेश कवळे, अंकुष साळवी, हर्षवर्धन पाटील यांनी विशेष मेहनत घेतली व हा कार्यक्रम यशस्वीरित्या झाला. या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

## पोयनाड येथील क्रिकेट स्पर्धेत उरणच्या अमेय पाटीलचे शतक

**अलिबाग : प्रतिनिधी**

झुंझार युवक मंडळ पोयनाड आयोजित १४ वर्षांखालील लेदर बॉल एक दिवसीय ४० षटकांच्या क्रिकेट स्पर्धेतील साखळी सामन्यात उरण क्रिकेट स्पोर्ट्स असोसिएशन संघाचा मधल्या फळीतला खेळाडू अमेय पाटील यांनी रायझिंग स्टार खोपोली संघाविरुद्ध नाबाद ११२ धावा काढत स्पर्धेतील दुसरे शतक झळकावले. त्याने १७ चौकार आणि एका षटकाराच्या सहायाने त्यांनी ८६ चेंडूंत नाबाद ११२ धावा ठोकल्या.



प्रथम फलंदाजी करताना उरण संघाने ४० षटकांच्या समाप्तीनंतर १० गडी बाद १९३ धावा केल्या होत्या. यात अमेयच्या ११२ धावांचा समावेश आहे. त्याला आदिती कदमने साथ देत २२ धावा केल्या. उरणच्या १९३ धावांना प्रत्युत्तर देताना खोपोली संघाने टक्कर दिली. आर्यन निकाळजेच्या ६३, तेजस गिलबिले ३०, तर अथर्व पाटीलने २३ धावा केल्या. उरण संघाने अंतिम षटकांत सामना १८ धावांनी जिंकला. अर्चित म्हात्रे चार, तर ओम म्हात्रे आणि मानव बावने यांनी प्रत्येकी ३ फलंदाज बाद केले. अमेय पाटील याला सामनावीर म्हणून गौरविण्यात आले.



## महाडमध्ये महिलांची क्रिकेट स्पर्धा

**महाड : प्रतिनिधी**

वेदा जनजागृती मंचाच्या वतीने महाडमध्ये महिलांच्या आंडरआर्म स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये पंचायत समिती महिला संघ विजेता झाला.

महिलांना विविध व्यासपीठ मिळवून देणारे डॉ. दिगंबर गिते यांच्या वेदा जनजागृती या सामाजिक मंचाच्या वतीने रविवारी (दि. २) महाड येथील भिलारे मैदानावर महिलांच्या आंडरआर्म क्रिकेट स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. साखळी पद्धतीने खेळल्या गेलेल्या या स्पर्धेत रायझींग स्टार, पंचायत समिती संघ, जगदंब शिक्षक संघ आणि दिशा अबॅकस संघाने भाग घेतला होता.

या वेळी अंतिम फेरीसाठी रायझींग स्टार व पंचायत समिती संघ यांच्यात निर्णायक सामना झाला. या मध्ये पंचायत समिती संघाने बाजी मारुन विजयी चषक पटकावला. तसेच या स्पर्धेत करुणा कदम यांना उत्कृष्ट फलंदाज तर पुर्वा बारटक्के यांची उत्कृष्ट गोलंदाज म्हणून निवड करण्यात आली.

## राज्यस्तरीय लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेत अलिबाग वकील संघाची उपांत्य फेरीत धडक

**रेवदंडा : प्रतिनिधी**

नाशिक येथील महाराष्ट्र व गोवा राज्यस्तरीय लेटर बॉल क्रिकेट स्पर्धेत ॲड. स्नेहेंद्र पवार यांच्या भेदक गोलदांजीने, तर ॲड. रोहित भोईर यांच्या दमदार फलदांजीने अलिबागच्या वकील संघाने उपांत्य फेरीत धडक मारली.





नाशिकमध्ये महाराष्ट्र व गोवामधील वकिलांसाठीची राज्यस्तरीय लेदर बॉल क्रिकेटची टी-२० क्रिकेट स्पर्धा होत आहे. या स्पर्धेत महाराष्ट्र व गोवामधील विविध जिल्ह्यांतील ७८ वकिलांचे संघ सहभागी झाले आहेत. स्पर्धेत उप-उपांत्य फेरीचे सामने पार पडले असून अलिबाग वकिलांच्या सी-हॉक्स ॲडव्होकेट क्रिकेट संघाने उपउपांत्य फेरीत बॉम्बे सिटी संघावर दणदणीत विजय मिळवित उपांत्य फेरीत धडक मारली आहे. या सामन्याचा सामनावीर अलिबाग सी-हॉक्स संघाचा स्नेहेंद्र पवार ठरला, त्याला मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. सी-हॉक्स संघाचा पुढील सामना पुणे-बी सोबत रंगणार आहे.

## रोठ बुद्रुक येथे आरोग्य तपासणी शिबिर

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील रोड बुद्रुक येथे तेरणा सह्याद्री हॉस्पिटल व ग्रामपंचायत रोठ बुद्रुक यांच्या संयुक्त विद्यमानाने रविवारी (दि. २) मोफत आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचा लाभ विभागातील २१० नागरिकांनी लाभ घेतला.



या शिबिराचे उद्‌घाटन ॲड. सुनील सानप यांच्या हस्ते करण्यात आले, तसेच जिल्ह्यातील हृदयरोग तज्ञ डॉ. अशोक जाधव, रोहा तालुका प्रमुख समीर शेडगे, स्वराज्य सामाजिक प्रतिष्ठान अध्यक्ष रोशन चाफेकर, शेडसई सरपंच प्रिया कडु यासह धाटाव एमआयडीसीतील अनेक मॅनेजर यांनी सदिच्छा भेट दिली.

धाटाव विभागातील काही लोकांना आर्थिक परिस्थितीमुळे औषधोपचार, लांब जाणे परवडत नाही. तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्याची काळजी म्हणून माझ्या ग्रामपंचायतीने हे शिबिर आयोजित केले होते, असे सरपंच नितीन वारंगे यांनी सांगितले.


या वेळी भाजप युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य अमित घाग, उपसरपंच वेदीका डाके, सदस्य वैभवी भगत, अक्षता वारंगे, ज्ञानेश्वर साळुंके, सचिव अलंका बामगुडे तसेच गावातील जेष्ठ खेळ वारंगे, दत्ता डाके, गुणाजी घाग आदी उपस्थित होते.

शिबिर यशस्वीततेसाठी राजमुद्रा फाउंडेशनचे अध्यक्ष राजेश डाके, कार्यध्यक्ष राजेश भगत, समीर वारंगे, विलास डाके, राहुल डाके, शशिकांत साळुंके, निलेश वारंगे, सागर डाके, श्रीकांत दरडे, निरंजन वारंगे, रितेश भाग, श्रद्धा घाग, सुप्रिया वारंगे, अमृता साळुंके, अमृता डाके, रोहिणी गोसावी आदींनी विशेष मेहनत घेतली.

## रायगडातील पहिले स्किल हब नेरळमध्ये

**कर्जत : बातमीदार**

देशभरात ५००० स्किल हबच्या माध्यमातून आठ लाख युवकांना मिळणार व्यवसायाभिमुख प्रशिक्षण देण्यासाठी सरकारच्या माध्यमातून स्किल हब उभारले आहेत. रायगड जिल्ह्यातील पहिले स्किल हब नेरळ येथे उभारण्यात येत असून त्याची सुरुवात रायगड जेएसएमने पुढाकार घेऊन केली आहे.



कौशल्य विकास व उद्योजगता मंत्रालय भारत सरकारच्या यांच्या माध्यमातून रायगड जिल्ह्यत जन शिक्षण संस्था काम करीत आहे. रायगड या योजनेत कार्य करत असणाऱ्या नेरळ-कर्जत येथे जनशिक्षण संस्थान रायगड आणि करिअर टेक्निकल संस्था यांच्या संयुक्त विद्यमानाने स्किल हबसाठी पुढाकार घेण्यात आला आहे. नेरळ येथे कौशल्य विकास मंत्रालयाचे स्किल हब योजनेतील जिल्यातील पहिले सेंटर सुरू करण्यात आले. असिस्टंट इलेक्ट्रिशियन आणि फिल्ड इंजिनीअर आरएसीव्ही प्रशिक्षण वर्गाचे सुरू करण्यात आले.

या योजनेत देशभरात ५००० स्किल हबच्या माध्यमातून आठ लाख युवकांना व्यवसायाभिमुख प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या प्रशिक्षण वर्गाच्या उद्‌घाटन सोहळ्याला इलेक्ट्रिशियन आणि एसी, फ्रिज व वॉशिंग मशीन रिपेरिंग वर सखोल मार्गदर्शन व प्रात्यक्षिक गणेश भोपी आणि विजय रणदिवे यांनी केले. या वेळी जनकल्याण संस्थानच्या संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा सोमैया, संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन गांधी आणि व्यवस्थापक मंडळ यांची उपस्थिती होती.

या संस्थेच्या मार्गदर्शनातून भारत सरकारच्या कौशल्य विकास योजने अंतर्गत कार्यक्रम राबवित आहे. उद्‌घाटनाच्या वेळी डॉ. सोमय्या यांच्यासह संचालक विजय कोकणे, अन्वया करंदीकर, कर्जत पंचायत समितीच्या माजी सभापती सुजाता मनवे, कौशल्य विकासचे राज्य प्रतिनिधी संजय वर्तक, तसेच कौशल्य विकासचे जिल्हा प्रतिनिधी सायली सुभाने, रोजगार समन्वयक नवीन भोपी, रंजना नवीन भोपी, असिस्टंट इलेक्ट्रिशियन प्रशिक्षकी गणेश भोपी, फिल्ड इंजिनीअर प्रशिक्षक विजय रणदिवे, पोस्ट मास्तर अविनाश डायरे, दिनेश कांबरी आदी उपस्थित होते.

## नववर्ष, वीकेण्डला पालीत पर्यटकांचाही ओघ वाढला

### रोजगाराला मिळाली चालना

**पाली : प्रतिनिधी**


महाराष्ट्रातील अष्टविनायक तीर्थ क्षेत्रापैकी प्रख्यात धार्मिक स्थळ असलेल्या पाली शहरात नववर्षाच्या पहिल्या व दुसऱ्या दिवशी शनिवारी व रविवारी बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी हजारो भाविक दाखल झाले होते. तसेच सुधागड तालुक्यातील पर्यटनस्थळे, लेण्या, स्तूप व अन्य पर्यटनस्थळी गर्दी झाल्याचे दिसून आले. सकाळपासूनच दर्शनासाठी मोठ्या रांगा लागल्या होत्या.

दर्शनासाठी रायगड जिल्हा, महाराष्ट्रातील विविध भागांसह मुंबई, ठाणे, पुणे आदी शहरांतील आणि परराज्यातून भाविक व पर्यटक मोठ्या प्रमाणावर पालीत दाखल झाले होते. पाली नगरपंचायतीचे कर्मचारी मास्क न लावणाऱ्या भाविकांकडून दंड वसूल करून मास्क घालण्याच्या सूचना देत होते.

> **नववर्षाच्या पहिल्या दिवशी मोठ्या प्रमाणात भाविक दर्शनासाठी आले होते. अनेकांनी चांगली खरेदी देखील केली. त्यामुळे व्यवसाय देखील चांगला झाला.**
>
> **-राहुल मराठे, व्यावसायिक, बल्लाळेश्वर मंदिर**

भाविकांची गर्दी असल्याने येथील दुकानदार व हॉटेल व्यवसायिकांचा धंदादेखील तेजीत होता. बल्लाळेश्वर मंदिर परिसरात गावठी भाज्या, फळे, कंदमुळे व रानमेवा घेऊन अनेक महिला विक्रेत्या बसल्या होत्या. देवळात येणारे भाविक आवर्जून ते खरेदी करत होते. त्यामुळे या विक्रेत्यांचा धंदा चांगला झाला.

मंदिर परिसरातील दुकाने व हॉटेल ग्राहकांनी गजबजले होते. भाविकांच्या सोईसाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली असल्याचे, ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. धनंजय धारप यांनी सांगितले. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यादृष्टीने पाली पोलीस निरीक्षक विश्वजित काइंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक नाक्यावर चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.




### जाहीर नोटीस

प्रो.जमा रु. ५०/- — अर्जदार तर्फे वकील श्री. स्वप्निल सूर्यकांत तारेकर

**पनवेल येथील मे. ज्युडी मॅजि वर्ग १ला यांचे कोर्टात**

क्रि.चौ. अर्ज नं. १३९४/२०२१

**श्री. अनिल पुंडलिक पाटील** — अर्जदार

विरुद्ध

ग्रामविकास अधिकारी / ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत, पारगाव, ता. पनवेल, जि. रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्री. अनिल पुंडलिक पाटील** यांचा मुलगा **कु. विघ्नेश अनिल पाटील** याचा दि. ०९/१/२००६ रोजी मौजे पारगाव, ता. पनवेल, जि. रायगड येथे झालेला आहे. सदर जन्माची नोंद संबंधित कार्यालयामध्ये करण्याचे राहून गेलेले आहे. कारण त्याचा जन्म मौजे पारगाव, ता. पनवेल, जि. रायगड येथे झाला आहे. सबब अर्जदार यांच्या मुलाच्या जन्माची नोंद केलेली नाही. सबब अर्जदार **श्री. अनिल पुंडलिक पाटील** यांचा मुलगा **कु. विघ्नेश अनिल पाटील** याचा जन्म दि. ०९/१/२००६ रोजी झालेला आहे. जन्म मृत्यू नोंदणी कायदा अधिनियम १९६९ चे कलम १३(३) प्रमाणे जन्माची उशिरा नोंद करून मिळणेबाबत संबंधित सक्षम अधिकारी **ग्रुप ग्रामपंचायत पारगाव, ता. पनवेल, जि. रायगड** यांना योग्य ते आदेश देणेबाबत नामदार कोर्टाने अर्ज दाखल केला आहे. सबब सदरचा जन्म नोंदीचा आदेश देण्यासंबंधी कोणाही कोणाच्याही कसल्याही इसमाच्या कोणत्याही हरकती आल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत. असे समजून अर्जदार यांस **कु. विघ्नेश अनिल पाटील** याच्या जन्माच्या नोंदीचा आदेश देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक ०१/०१/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सहीशिक्क्याने दिली.

सही/- कनिष्ठ लिपिक, फौजदारी न्यायालय | शिक्का | सही/- सहा. अधिक्षक, फौजदारी न्यायालय

# विजयी आघाडीसाठी टीम इंडिया सज्ज

## आजपासून द. आफ्रिकेविरुद्ध दुसरी कसोटी



**जोहान्सबर्ग : वृत्तसंस्था**

पहिल्या कसोटीत सेंच्युरियनवर दिमाखदार विजयानिशी दक्षिण आफ्रिकेतील कसोटी मालिकेला प्रारंभ केल्यानंतर जोहान्सबर्गला होणाऱ्या दुसऱ्या कसोटीसाठी भारतीय संघ पुन्हा एकदा सज्ज झाला आहे. या सामन्यातही बाजी मारून टीम इंडिया विजयी आघाडी घेण्याचा प्रयत्न करेल, तर यजमान बरोबरीसाठी शिकस्त करतील.

दुसऱ्या कसोटीसाठी भारताच्या वेगवान माऱ्यात शार्दूल ठाकूरऐवजी उमेश यादवचा समावेश केला जाण्याची दाट शक्यता आहे. अष्टपैलू वेगवान गोलंदाजाला कर्णधार विराट कोहली नेहमीच प्राधान्य देतो. त्यामुळे आणखी एका फलंदाजाचे धावसंख्येत खात्रीचे योगदान मिळते. याच अपेक्षेने शार्दूलकडे पाहिले जात होते. शार्दूलने पहिल्या कसोटीत १६ षटकांत दोन बळी मिळवले, तर दोन डावांत अनुक्रमे ४ आणि १० धावा काढून निराशा केली. त्यामुळे वाँडर्सच्या खेळपट्टीकडे पाहून मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड आणि कोहली रणनीतीमध्ये बदल करण्याची शक्यता आहे.

वाँडर्सच्या खेळपट्टीवर मोठ्या प्रमाणात गवत असून शहरात पाऊसही पडत आहे. त्यामुळे वातावरणातील आर्द्रतेची वेगवान गोलंदाजांना साथ मिळू शकेल. उमेश या स्थितीत चेंडू उत्तम स्विंग करू शकेल, असे म्हटले जात आहे.

# प्रो कबड्डीत ट्रिपल हेडरचा थरार

## तिन्ही सामने सुटले बरोबरीत

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

प्रो कबड्डी लीगमध्ये नव्या वर्षाच्या पहिल्या दिवशीच्या तिन्ही लढती बरोबरीत सुटल्या. यूपी योद्धा आणि यू मुम्बा यांच्यातील सामना २८–२८ असा बरोबरीत सुटला. त्यानंतर झालेल्या लढतीत बंगळुरू बुल्स विरुद्ध तेलुगू टायटन्स यांच्यातील सामना ३४–३४ असा बरोबरीत सुटला. हा थरार कमी होता की काय म्हणून दबंग दिल्ली आणि तमिळ थलायवाज यांच्यातील सामनाही ३०–३० असा बरोबरीत सुटला.

प्रो कबड्डीच्या इतिहासात पहिल्यांदाच इतका थरार पाहायला मिळाला आहे. यंदाच्या हंगामात पहिल्यांदाच ट्रिपल हेडर सामने खेळवण्यात येत आहेत. यात शनिवारी दिवशी कमालीची रंगत अनुभवायला मिळाली. तिन्ही सामन्यात पारडे कधी या बाजूने, तर कधी त्या बाजूने झुकताना दिसले. अखेर तिन्ही सामने बरोबरीत सुटले. या हंगामात आतापर्यंत सात सामने बरोबरीत सुटले आहेत. यूपीचा रेडर सुरेंद्र गिलने ८ आणि यू मुम्बाचा रेडर अजीत कुमारने



९ पॉइंट्स मिळवले. यू मुम्बाचा स्टार अभिषेक सिंह आणि यूपीचा डुबकी किंग प्रदीप नरवालने प्रत्येकी ४ पॉइंट्स घेतले.

बंगळुरू बुल्स आणि तेलुगू टायटन्स यांच्यातील दुसऱ्या लढतीत ३४–३४ असा स्कोअर झाला. या सामन्यात टायटन्सकडून अंकित बेनिवालने सुपर १०चा पराक्रम केला. तमिळ थलायवाज आणि दबंग दिल्ली यांच्यातील शेवटच्या सामन्यातही चांगलीच रंगत झाली. दिल्लीचा रेडर नवीन कुमारने १५ पॉइंट्स मिळवले. दुसरीकडे थलायवाजकडून मंजीत कुमारने १० पॉइंट्ससह सुपर १० कामगिरी केली, पण दोघेही आपल्या संघाला विजय मिळवून देण्यात अपयशी ठरले.

## रोमन रेंसला कोरोना; बहुचर्चित फाईट रद्द

**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

डब्ल्यूडब्ल्यूई युनिवर्सल चॅम्पियन रोमन रेंसचा कोरोना रिपोर्ट पॉझिटिव्ह आला आहे. त्यामुळे डब्ल्यूडब्ल्यूई पीपीवीमधील पहिल्या दिवसातील ब्रॉक लॅसनर विरुद्धची त्याली फाईट स्थगित करण्याची वेळ आली आहे. रेंसने ट्विटच्या माध्यमातून स्वत: या संदर्भातील माहिती दिली.

नव्या वर्षात रोमन रेंस विरुद्ध ब्रॉक लॅसनर यांच्यातील लढतीची चाहत्यांना कमालीची उत्सुकता होती. यावर कोरोनाने पाणी फेरले आहे. डब्ल्यडब्ल्यूईने दोघांमधील लढतीचे जोरदार प्रमोशन केले होते.

## आरोग्य प्रहर

### रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी सुपरफूड्सचा करा आहारात समावेश

कोरोना विषाणूचा नवीन प्रकार ओमायक्रॉनने लोकांच्या अडचणी वाढवल्या आहेत. अशा परिस्थितीत आरोग्याची काळजी घेणे आणि रोगप्रतिकारक शक्तीचीदेखील काळजी घेणे खूप महत्त्वाचे आहे. अशा वेळी तुम्ही काही सुपरफूड्सचा आहारात समावेश करू शकता.

रताळे – व्हिटॅमिन ए, पोटॅशियम आणि इतर पोषक तत्त्वांनी रताळे समृद्ध आहे. ते व्हिटॅमिन सी प्रदान करते आणि रोगप्रतिकार शक्ती वाढवते.

आवळा – रोगप्रतिकार शक्ती वाढवण्यास आवळा मदत करतो. यामध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते. भरपूर पोषक असतात.

खजूर – केकपासून शेकपर्यंत अनेक प्रकारे खजूर वापरले जातात. यामध्ये जीवनसत्त्वे, खनिजे आणि फायबर भरपूर प्रमाणात असतात.

गूळ – गुळामध्ये लोह, मॅग्नेशियम, जस्त आणि पोटॅशियम सारखी अनेक खनिजे असतात. ते फ्लू आणि सामान्य सर्दीसारख्या रोगांशी लढण्यासदेखील मदत करते.

बाजरी – बाजरीमध्ये भरपूर फायबर असते. भरपूर पोषक, जीवनसत्त्वे आणि खनिजेही असतात.

ब्रोकोली – हे पोषक तत्त्वांचे पॉवरहाऊस आहे. ब्रोकोलीमध्ये बीटा–कॅरोटीन, पोटॅशियम, मॅग्नेशियम, जस्त आणि लोह भरपूर प्रमाणात असते.

भुईमूग – अँटिऑक्सिडंट्स, जीवनसत्त्वे आणि खनिजे भरपूर प्रमाणात शेंगदाण्यामध्ये असतात.













उलवे नोड : भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या शेलघर येथील निवासस्थानी शनिवारी श्रीसत्यनारायणाच्या महापूजेचे आयोजन करण्यात आले होते. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि उरणचे आमदार महेश बालदी यांनी या ठिकाणी उपस्थित राहून महापूजेचे दर्शन घेतले. त्यांचे स्वागत करण्यात आले. या वेळी अरुणशेठ भगत यांच्या कार्यालयाचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. भाजप तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष आनंद ढवळे, कुंडेवहाळचे सरपंच सदाशिव वास्कर, गव्हाणचे उपसरपंच विजय घरत, जि. प. सदस्य अमित जाधव, पं. स. सदस्य वसंत काठावले, रत्नप्रभा घरत, भूपेंद्र पाटील, नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, विकास घरत, अमर पाटील, शत्रुघ्न काकडे, अभिमन्यू पाटील, प्रवीण पाटील, हरेश केणी, बबन मुकादम, नगरसेविका चारुशीला घरत, दर्शना भोईर, नेत्रा पाटील, तसेच रतनशेठ भगत, निलेश भगत, योगेश लहाने, शिवकुमार मढवी, हरेश पाटील, मयूर कदम, के. सी. पाटील, नारायण भोपी, किशोर पाटील, विश्वनाथ कोळी, श्रीयांश भगत यांच्यासह कुटुंबीय आणि हितचिंतक उपस्थित होते.










पनवेल : दरवर्षीप्रमाणे यंदाही कोरेगाव भीमा येथे शनिवारी विजयस्तंभ अभिवादन कार्यक्रम झाला. या पार्श्वभूमीवर स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे रायगड जिल्हाध्यक्ष महेश साळुंके यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेतली. या वेळी त्यांनी सातारा येथे 'लोकनेते रामशेठ ठाकूर भवन' उभारल्याबद्दल, तसेच नवीन वर्षानिमित्त लोकनेते रामशेठ ठाकूर यांना राधा–कृष्णाची प्रतिमा देत शुभेच्छा दिल्या.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com